७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १७ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ

**मंत्रिमंडळाचे सहा मोठे निर्णय**

**मुंबई (दै. संध्या)**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्याचसोबत नागपूर येथील महत्त्वाकांक्षी वैद्यकीय प्रकल्पापासून ते ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणासाठीच्या नवीन धोरणांपर्यंत अनेक मोठे निर्णय आज घेण्यात आले.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या विविध विभागांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. आजचे निर्णय हे प्रामुख्याने ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य सुविधेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवणे यावर केंद्रित आहेत.

वैद्यकीय उपचारांमध्ये अधिक अचूकता आणण्यासाठी नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारणीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मध्य भारतातील हा एकमेव आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून विविध गंभीर रोगांचे आणि आजारांचे वेळेत व अचूक निदान करणे शक्य होणार असल्याने, सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे. (विभाग: वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

राज्यातील ग्रामीण भागात भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नवीन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास करण्यावर भर दिला जाईल. विविध पाणी योजनांचे एकत्रिकरण करून, ग्रामीण जनतेला स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणीपुरवठा व्हावा यासाठी दीर्घकालीन नियोजन केले जाणार आहे. (विभाग: पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी चालना देत Maharashtra Unmanned Systems Policy (धोरण-२०२६) जाहीर करण्यात आले आहे. हवाई, सागरी तसेच जमिनीवरील कृषी व इतर क्षेत्रांतील अवघड आणि जोखमीच्या कामांसाठी ड्रोन आणि विविध रोबोट्सची निर्मिती या धोरणांतर्गत केली जाईल. या क्षेत्रात संशोधन, विकास (R&D) आणि मनुष्यबळ प्रशिक्षणाला विशेष प्रोत्साहन दिले जाणार आहे. (विभाग: इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग)

राज्यात 'अमेंडेड भारत नेट कार्यक्रम' अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी सुधारित पद्धतीला मंजुरी देण्यात आली आहे. हा कार्यक्रम गतीने पूर्ण करण्यासाठी "महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (MDIL)" या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणा (State-led Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. (विभाग: इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग)

'विकसित भारत - जी राम जी (व्ही बी जी राम जी) योजनेची' राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ शी सुसंगत अशा आवश्यक तरतुदी 'महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७' मध्ये केल्या जाणार असून, यासाठीचा अध्यादेश काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे. (विभाग: नियोजन विभाग)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. अशा उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. यासाठी मुंबई महापालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम आणि नगरपरिषदा अधिनियमात आवश्यक सुधारणांना मंजुरी देण्यात आली.

## मान्सून कोकणातच अडकला, मुंबईत कधी येणार?

**मुंबई (दै. संध्या)**

**उशीर झाल्यास मुंबईकरांवर पाणी कपातीचं मोठं संकट**

एरवी कायम 7 ते 8 जूनपर्यंत मुंबईत येणारा मान्सूनचा पाऊस यंदा 15 तारीख उलटून गेली तरी मुंबईत दाखल झालेला नाही. त्यामुळे मुंबईकरांना उकाड्यासोबतच पाणी कपातीच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. मान्सून तळकोकण आणि रत्नागिरीत काही दिवसांपूर्वीच दाखल झाला होता. त्यानंतर तो मुंबईत येईल, असे वाटत असतानाच मान्सूनच्या वाटचालीला अचानक ब्रेक लागला आहे. मान्सून आता 20 जूननंतर पुढे सरकेल, असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. 18 ते 20 जूनदरम्यान दक्षिण किनारपट्टीवरुन मान्सून पुन्हा जोर धरेल, असे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे मुंबईकरांना पावसासाठी आणखी काही दिवस वाट पहावी लागणार आहे. पाऊस नसल्यामुळे मुंबईच्या वातावरणातील प्रचंड उकाडा अजूनही कायम आहे. मुंबईमध्ये सोमवारी सांताक्रूझ येथे 35.2 तर कुलाबा येथे 35 अंश सेल्सिअस कमाल तामपान नोंदले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा अनुक्रमे 3.1 आणि 3.5 अंशांनी अधिक होते. किमान तापमान 30 अंशांहून खाली उतरले असले तरी किमान तापमानानेही अजून फारसा दिलासा दिलेला नाही. त्यामुळे मुंबईकरांना अजूनही उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच हवेतील आर्द्रताही 60 ते 70 टक्क्यांदरम्यान असल्याने उकाड्यापासून मुंबईमध्ये दिलासा मिळण्याची अजिबातच संधी नव्हती. मुंबईमध्ये मंगळवारीही हेच वातावरण कायम राहील, अशी शक्यता आहे. मुंबईत पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने आणि धरणांमधील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत असल्याने आता आगामी काळात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील साठ्यावर प्रशासनाची नजर असून, सध्याची परिस्थिती अशीच कायम राहिल्यास पाणी कपातीचा निर्णय आणखी कठोर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## एअरफोर्स अधिकाऱ्याच्या पत्नीवर बलात्कार
### धर्मपरिवर्तनाचाही प्रयत्न झाला

**नागपूर (दै. संध्या)**



नागपूरमध्ये भारतीय वायुसेना (IAF) च्या एका अधिकाऱ्याच्या 24 वर्षीय पत्नीवर बलात्कार, ब्लॅकमेलिंग आणि जबरदस्तीने धर्मांतराचे प्रकरण समोर आले आहे. मुख्य आरोपी अयाज ताज मदारे हा तिचा शाळेतील जुना वर्गमित्र आहे.

पीडितेनुसार, अयाज तिच्यावर धार्मिक मंत्रांशी संबंधित विधी करत असे. त्यानंतर तिच्यावर बलात्कार करत असे. धर्मांतराशी संबंधित एक व्हिडिओ देखील समोर आला आहे, ज्यामध्ये अयाज तिचे हात धरून धार्मिक मंत्र वाचताना दिसत आहे.

व्हिडिओमध्ये महिला म्हणते, 'तुला भांडायची खूप सवय आहे ना, हात सोड ना... सोड.' त्यानंतर ती सतत 'मला सोडून दे' असे म्हणत रडताना आणि विरोध करताना दिसते. तर आरोपी तिचे हात घट्ट धरून असतो.

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेचा पती भारतीय वायुसेनेत आहे आणि सध्या दुसऱ्या शहरात कार्यरत आहे. महिला प्रॉपर्टी डीलिंगचे काम करते. फेब्रुवारी 2025 मध्ये आरोपी अयाजने प्लॉट खरेदी करण्याच्या बहाण्याने तिच्याशी संपर्क साधला होता. एफआयआरनुसार, आरोपीने महिलेला वर्धा रोडवरील एका हॉटेलमध्ये बोलावले. महिलेचा आरोप आहे की, तिथे तिला नशीला पदार्थ मिसळलेले ज्यूस पाजण्यात आले. बेहोश अवस्थेत तिच्यावर बलात्कार करण्यात आला आणि तिचे फोटो-व्हिडिओ बनवण्यात आले. नंतर याच आक्षेपार्ह व्हिडिओंच्या माध्यमातून तिला ब्लॅकमेल करण्यात आले. आरोपीने अनेकदा तिचे लैंगिक शोषण केले आणि तिच्याकडून सुमारे 4 लाख रुपयेही वसूल केले. महिलेने आरोप केला की, तिच्यावर इस्लाम स्वीकारण्यासाठी दबाव टाकण्यात आला आणि धार्मिक विधींच्या नावाखाली अनेक गोष्टी करून घेण्यात आल्या.

## आई, साईबाबा तर कोणी मुलाची शपथ घेतली
### *तुम्हाला सोडणार नाही, खासदारांनी उद्धव ठाकरेंना शब्द दिल्याचा संजय राऊतांचा दावा*

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार फुटणार आणि ते शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. रविवारी 'मातोश्री' वर झालेल्या बैठकीला केवळ 5 खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते, तर 4 खासदार ऑनलाइन जोडले गेले होते. यानंतर खासदार संजय देशमुख यांनी दिल्ली गाठून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे. या सर्व घडामोडींवर शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत मोठा दावा केलाय.

संजय राऊत म्हणाले की, ऑपरेशन हे इस्पितळात होत असते. राजकीय लोक कधीपासून हातात कैची आणि सुरी घेऊन ऑपरेशन करायला लागले? याला फोडाफोडी म्हणतात. माणसांची खरेदी-विक्री करणे याला फोडाफोडी म्हणतात. महाराष्ट्र आणि देशात गेल्या बारा वर्षांत यापेक्षा वेगळं काही चाललेलं नाही. तृणमूल काँग्रेसचे वीस-बावीस खासदार गेले, नॅशनल सिटीझन पार्टी ऑफ इंडिया या आंतरराष्ट्रीय पक्षात त्यांचा प्रवेश झाला आहे. याला तुम्ही भारतीय जनता पक्षाची भूक म्हणणार, हाव म्हणणार; पण शिवसेनेच्या बाबतीत या बातम्या चुकीच्या आहेत. उद्धव ठाकरे भेटत नाहीत, आमच्या पक्षाला निधी मिळत नाही, आदित्य ठाकरे महाराष्ट्रात फिरत नाहीत, अशी खंत काही खासदारांनी व्यक्त केल्याची चर्चा रंगली आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्याइतका लोकप्रतिनिधींना आणि कार्यकर्त्यांना भेटणारा नेता या क्षणी शरद पवारांनंतर महाराष्ट्रात नाही. शरद पवार भेटतात, उद्धवजी भेटतात. आम्ही सगळे भेटत असतो. मातोश्रीचे दरवाजे सदैव सर्वांसाठी उघडे असतात. आमच्याकडे आतापर्यंत कोणी तक्रार घेऊन आलेले नाही. ग्रामीण भागातील खासदार मुंबईत आले की ते हमखास उद्धवजींना भेटतात. विधिमंडळाच्या काळात आमदार येतात, तेव्हा उद्धवजींना भेटतात. त्यामुळे या बातमीत काहीही तथ्य नाही. शिवसेनेचे नऊ खासदार एकत्र आहेत आणि एकत्रच राहतील. रविवारी मातोश्रीवरील बैठकीत पाच खासदार उपस्थित राहिले, तर चार खासदार ऑनलाइन उपस्थित होते. त्यानंतर संजय देशमुख यांनी दिल्ली गाठून केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे यांचा संवाद कमी पडतो आहे का, याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, आमच्याकडे ईडी असती तर धाक कायम आला असता. सध्या धाक म्हणजे मोदींचा धाक, अमित शहांचा धाक. हा व्यक्तिगत धाक नाही. सीबीआय (CBI), ईडी (ED) त्यांच्या हातात आहे, म्हणून हा धाक आहे. तुम्ही उद्या सत्तेवर नसाल, तेव्हा तुमचा कोणता धाक राहणार? एखाद्या मंत्र्याला खासदार भेटला तर त्यात विशेष काय? उद्या कामानिमित्त मी पंतप्रधानांनाही भेटू शकतो, असे संजय राऊत म्हणाले.

'ज्यांना जायचंय त्यांनी जा' असं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी खासदारांच्या बैठकीत केल्याची माहिती समोर आली. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, मी त्या बैठकीला पूर्ण वेळ होतो. उद्धव ठाकरेंनी अशा प्रकारचे कोणतेही वक्तव्य केलेले नाही. हे मी ठामपणे सांगतो. 'जायचं असेल तर जा' हे वाक्य त्यांच्या तोंडी घातलेलं आहे. माझ्यासमोर ते असे बोललेले नाहीत आणि ते असे बोलणारही नाहीत. हे चार ते पाच वर्षांपूर्वीचे वक्तव्य आहे. जेव्हा आम्ही आमदारांना हॉटेलमध्ये बंद करून ठेवलं, तरीही ते पळून जात होते, तेव्हा ते रागाने म्हणाले होते की, अशांना डांबून ठेवून काय उपयोग आहे? या वेळेला त्यांनी अशा प्रकारचे कोणतेही विधान केलेले नाही.

**ढिंग-टांग**




## मनसेचा जैन समाजाला नवा प्रस्ताव, नितेश राणेंनाही टोला; वेदपाठकांना पाठिंबा कायम

# पांढऱ्या पट्ट्यांऐवजी झाडं लावा!

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबईतील जैन समाजासाठी रस्त्यांवर काढण्यात आलेल्या पांढऱ्या पट्ट्यांवरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र होताना दिसत आहे. या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आता जैन समाजासमोर एक पर्यायी प्रस्ताव ठेवला आहे. पांढऱ्या पट्ट्या रंगवण्याऐवजी झाडे लावून परिसर थंड ठेवावा, असा सल्ला मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिला आहे. विशेष म्हणजे हा प्रस्ताव मांडताना त्यांनी राज्याचे मंत्री आणि भाजप नेते नितेश राणे यांनाही उपरोधिक टोला लगावला. दरम्यान, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि युट्यूबर प्रसाद वेदपाठक यांनी आज संदीप देशपांडे यांची भेट घेतली. या भेटीनंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत दोघांनीही पांढऱ्या पट्ट्यांच्या वादावर आपली भूमिका स्पष्ट केली.

पत्रकार परिषदेत बोलताना संदीप देशपांडे म्हणाले की, जैन मुनींना उन्हामुळे त्रास होऊ नये याची काळजी आम्हालाही आहे. मात्र त्यासाठी सार्वजनिक रस्त्यांवर पांढऱ्या पट्ट्या रंगवणे हा उपाय योग्य नाही. "जैन समाजाने पांढऱ्या पट्ट्या काढण्याऐवजी झाडे लावावीत. त्या झाडांच्या सावलीतून जैन मुनी चालू शकतील. त्यामुळे वातावरण थंड राहील, पर्यावरणाचेही संरक्षण होईल आणि कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत," असे देशपांडे म्हणाले.

झाडे लावण्याचा प्रस्ताव मांडताना संदीप देशपांडे यांनी मंत्री नितेश राणे यांच्यावरही उपरोधिक टिप्पणी केली. "झाडं हिरवीच असतात. आता त्या हिरव्या रंगाबद्दल नितेश राणेंना काही आक्षेप असेल तर त्याला आम्ही काय करू शकत नाही," असा टोला त्यांनी लगावला. त्यांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी काही जैन समाजाच्या प्रतिनिधींनी केली होती. त्यावरही संदीप देशपांडे यांनी उपहासात्मक प्रतिक्रिया दिली. "सीबीआयच का? मग रॉ किंवा एनआयएकडेही चौकशी द्या," असा टोला त्यांनी लगावला. सार्वजनिक मालमत्तेवर अशा प्रकारे रंगकाम करणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी रस्त्यांचे विद्रूपीकरण थांबवण्याची मागणी केली. "ज्या सोसायट्यांमध्ये जैन समाज राहतो, त्यांनी तेथे झाडे लावावीत. त्याला कोणाचाही विरोध असणार नाही," असेही ते म्हणाले.

## पवनराजे निंबाळकर खटला, निकालाची तारीख पुन्हा पुढे ढकलली




**हत्या केल्याने विरोधक संपत नसतो**

न्याय मिळावा, हीच अपेक्षा आहे. अशा पद्धतीने एका माणसाचा खून केल्यावर तुमचा राजकीय विरोधक संपत नसतो, तो विरोधक तयार होत असतो, याच जिद्दीने मला इथवर आणलं, माझा राजकीय जन्मच त्यातून झाला. धाराशिव मतदारसंघातील जनता माझ्या पाठीशी उभी राहिली आहे. ज्यासाठी आमचा परिवार जगतो, पवनराजे निंबाळकर आणि समद काझी यांना न्याय मिळावा. त्यामुळे, सध्या डोक्यात एकच आहे, पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणाचा निकाल लवकर लागावा, असेही ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले.

**धाराशिव (दै. संध्या)**

जिल्ह्यातील राजकीय वादाचे रुपांतर हत्याप्रकरणात होऊन घडलेल्या घटनेला 20 वर्षे उलटून गेली असून फिर्यादी न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. 3 जून 2006 रोजी मुंबईवरून उस्मानाबादला जात असताना नवी मुंबईच्या कळंबोलीत राजकीय वादातून पवनराजे निंबाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी सुरू असलेला न्यायालयीन खटला अंतिम टप्प्यात असून आज 16 जून रोजी निकालाची तारीख देण्यात आली होती. मात्र, आणखी काही कमतरता दूर करण्यासाठी आता 20 जून ही नवी तारीख देण्यात आली आहे. आज निकालाची तारीख असल्याने दिवंगत पवनराजे निंबाळकर यांचे चिरंजीव ओमराजे निंबाळकर हेही आज न्यायालयात उपस्थित होते. कोर्टाने पुढील तारीख दिल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली.

आमच्या दोन्ही कुटुंबानी 20 वर्षे 13 दिवस संघर्ष केला आहे, त्यामुळे आम्हाला न्याय मिळेल एवढीच अपेक्षा आहे. सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो, अशी प्रतिक्रिया ओमराजे निंबाळकर यांनी दिली.



## संपादकीय

# भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा काळ

भारत आज विविध क्षेत्रांत अत्यंत वेगाने विकास करत आहे. अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा, ऊर्जा, पायाभूत सुविधा, राष्ट्रीय सुरक्षा, विज्ञान यांसह, विविध क्षेत्रांत देश नवनवी उंची गाठत आहे. भौतिक विकासाच्या या सर्व क्षेत्रात प्रगती करत असताना, हेही महत्त्वाचे आहे, की आपण आपली प्राचीन संस्कृती, इतिहास, वारसा आणि परंपरांना विसरून जाऊ नये. भारत जगातील अतिप्राचीन मात्र जिवंत संस्कृतींपैकी एक देश आहे, कित्येक शतके, परदेशी आक्रमकांसोबत सुरू असलेल्या संघर्षात, देशाच्या राजकीय सत्तेत बदल होत राहिले, मात्र त्या काळातही, भारत आपली संस्कृती एका पिढीकडून, दुसऱ्या पिढीपर्यंत यशस्वीपणे सोपवत राहिला. या काळात झालेल्या राजकीय उलथापालथीत,आपली धार्मिक स्थळे, ग्रंथसंपदा, वाचनालये, विद्यापीठे, सगळ्यांचा विध्वंस करण्यात आला. मात्र तरीही, आपली संस्कृती आणि परंपरा जिवंत राहिल्या. सांस्कृतिक भारतावर दुसरा घाला आमच्या शिक्षण पद्धतीत केलेल्या बदलांमुळे घातला गेला. या हल्ल्यातून, आमच्या अंतर्मनात आपल्याच संस्कृतीविषयी हीन भावना निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले. वर्ष २०२४ पासून, मात्र, भारताने आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासोबतच, सांस्कृतिक क्षेत्रात एक मोठे परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली, हे वर्ष आपल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या प्रारंभाचे वर्ष म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सांस्कृतिक भारत आज आपल्या अभिमानास्पद भूतकाळाचे पुन:स्मरण करत, त्याचे वैभव, त्याची भव्यतेची पुनर्स्थापना करत आहे, त्याचवेळी सामाजिक जीवनात देखील तीच संस्कृती पुन्हा स्थापन केली जात आहे. आज आपले उत्सव, प्राचीन आणि ऐतिहासिक स्मारके, खाद्यसंस्कृती, वस्त्र कला, नृत्य, संगीत, शास्त्र, शिल्पकला ह्या सगळ्या गोष्टी जागतिक आकर्षणाचे केंद्र बनल्या आहेत. भारतीय संस्कृतीची वाढती स्वीकारार्हतागेल्या १२ वर्षांत जगात भारतीय संस्कृती केवळ स्वीकारार्ह ठरली नाही, तर लोकप्रिय होते आहे. आज सगळे जग, २१ जूनला योग दिवस साजरा करतात. हा केवळ शारीरिक व्यायाम नाही, तर, हे एक प्राचीन भारतीय दर्शनशास्त्र आहे, एक विज्ञान आहे जे आज जगन्मान्य झाले. मानवी आयुष्यात त्याची उपयुक्तता बघा, त्याला जगाने स्वीकारले. आज जगातील अनेक देशात असलेल्या आपल्या वारशाच्या वस्तू, भारतात परत आणल्या जात आहे, त्यांची संख्या देखील, एक अत्यंत रोचक वास्तव आहे. वर्ष २०१३ च्या आधी, केवळ १३ वारसा वस्तू परदेशातून भारतात आणल्या गेल्या. मात्र गेल्या १२ वर्षांत ६४० पेक्षा अधिक वारसा वस्तू, परदेशातून भारतात आणल्या गेल्या आहे. संस्कृतीमध्ये केवळ परंपरांचे पुनरुज्जीवन नाही, तर संस्कृतीची प्रतीक चिन्हे परत आणण्यातही आम्ही गांभीर्य दाखवले आहे. ही प्रतीक चिन्हे, आमच्यासाठी अभिमानाचा विषय आहे, ह्या आमच्या पूर्वजांची कला, शिल्प आणि विविध विषयांच्या ज्ञानाच्या खुणा आहेत, चिन्हे आहेत, ज्यातून आपल्याला प्रेरणा मिळते आहे. दुर्गा पूजा आणि दिवाळी यांसारख्या सामाजिक-धार्मिक उत्सवांना, युनेस्कोने जागतिक अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून मान्यता दिली. ही मान्यता, केवळ उत्सवांना नसते, तर त्यामागे असलेल्या संदेशांनाही दिली जाते. विचारांना दिली जाते, जे सांगतात, की असत्यावर कायम सत्याचा विजय होतो. आपल्या प्राचीन इतिहासालाही आज युनेस्कोने मान्यता दिली आहे. त्याचा पुरावा म्हणजे, भारत ४४ जागतिक वारसा स्थळांना मान्यता मिळून, भारत या क्रमवारीत आशियात दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. ही वारसास्थळे, आपल्या परंपरांचे प्रतीक आहेत, ज्यांच्याकडे बघून, भारतीयांना आपली संस्कृती आणि इतिहासाची ओळख होते आणि त्याविषयी अभिमान वाटतो. विस्मृतीत गेलेल्या, विखुरलेल्या ज्ञानाचे संकलन भारत बराच काळ परकीय आक्रमकांशी संघर्ष करत राहिला. ज्ञान आणि संस्कृतीचा आदर न करणाऱ्या या परकीय आक्रमकांनी आपल्या देशाच्या अमूल्य ज्ञानपरंपरेचा वारसा असलेली समृद्ध विद्यापीठे, गुरुकुले आणि हस्तलिखितांमध्ये नोंदविलेले ज्ञान नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दीर्घ कालखंडात आपल्या ज्ञानपरंपरेची अमूल्य संपत्ती असलेली ही हस्तलिखिते विविध मठ, मंदिरे, संस्था आणि घरांमध्ये जतन केली गेली.

## संस्कृत सुभाषित

आयुधनिषेध्यो रिपवो न सामसाध्या: ।।

अर्थ – जो शत्रू किंवा जो रोग फक्त शस्त्रप्रयोगानेच नष्ट होणारा असतो, तो साध्या उपायांनी आवरत नाही.

## गुरु वचन

### दु:खावर विजय मिळवा

सिद्धार्थ नावाचा राजकुमार होता. त्याला जीवनात काहीच कमी नव्हते. तो सुंदर, सुदृढ व सद्गृहस्थ होता. त्याला कुठलेही शारीरिक किंवा मानसिक कष्ट नव्हते. त्याच्यापुढे सुख–समृद्धी हात जोडून उभी होती. त्याची पत्नी यशोधरा ही सुंदर, सुदृढ व पतीव्रता होती. त्याचा मुलगा राहुल सुद्धा मनमोहक व सुदृढ होता. सर्व काही होऊनही सिद्धार्थ दु:खाच्या अनुभूतीने पिडीत राहत होता.

खरं म्हणजे जन्मानंतर माणूस कुठल्यातरी शारीरिक किंवा मानसिक दु:खाने पिडीत असतो. दु:खांना पाहून व अनुभवूनच सिद्धार्थ बुद्धात रूपांतरित झाले. अभावावाचे कारण आपण अभावासच दु:खाचे कारण मानतो. जगातील बहुतेक श्रीमंत लोक दु:खी व असमाधानी आहेत. एखादी वस्तु किंवा व्यक्तीचा अभावच त्यांना दु:खी करतो. काही लोकांकडे पैशांची कमी नाही पण ते शारीरिक दु:खाने पिडीत आहेत.

काही लोक काम, क्रोध, ईर्ष्या, द्वेष, मोह सारख्या मानसिक दु:खांनी ग्रस्त असतात. तसेच काही लोक अज्ञानामुळे दु:खी आहेत. जर काही लोकांना दु:ख नसेल तर त्यांच्यासाठी जन्म–मृत्यूचे दु:खच काय कमी आहे? विजय म्हणजे लक्ष्य.जगात सुखाचे काही क्षण असतात. याचे प्रमाण आपणास लोकांचे हसणे, बोलणे, गाणे, खेळण्यात व आनंद साजरा करण्यात मिळू शकते. काही लोक थट्टा–मस्करी करताना दिसतात पण हे सर्व सुख क्षणभंगुर व तात्पुरते आहे. हा सर्व खटाटोप दु:खातून वाट काढण्याचा उपक्रम आहे. जर दु:खास जीवनाचा एक भाग मानले तर आपण याचाच विचार करून आपण आपले बहुमूल्य जीवन नष्ट केले पाहिजे? नाही, आपले लक्ष्य दु:खांवर विजय मिळवणे आहे. हाच आमचा पुरुषार्थ आहे. जगास दु:खालय मानून तडफडत मरणे मानवाचा लज्जास्पद पराभव आहे. त्याने जगास परीक्षा–स्थळ मानत दु:ख–सागरास ओलांडण्याचा उपाय शोधला पाहिजे. यामुळे त्यास सुख व शांतता लाभेल. जिथे रोग आहेत, तिथे उपचार आहे, जिथे अडचणी आहेत, तिथे त्यातून निघण्याचा मार्ग उपलब्ध आहे. फक्त आपल्या हृदयात खरी जिज्ञासा असण्याची गरज आहे. तसेच आपल्या लक्ष्याप्रती निष्ठावान व साहसी बनावे. विचारवंत मानतात की, मानवाची विषय तृष्णाच सर्व दु:खांचे मूळ आहे. जर ते तृष्णाच्या मृग–मरीचिकात फसण्यात स्वत:ला वाचवू शकले तर निश्चितपणे त्यांना कुठलेच दु:ख असणार नाही.

आपणास समोर जे दिसते, मनात तेच मिळण्याची इच्छा असते. जे आपल्याकडे आहे, त्यापेक्षा जास्त मिळवण्याची इच्छा करणेच तृष्णा आहे, जी कधीच पुर्ण होत नाही. जे आपल्याकडे आहे, त्यात समाधान मानून जर जास्तीत जास्त मिळवण्याची अनावश्यक इच्छा सोडली तर सर्व दु:ख टाळले जाऊ शकतात.

जगातील सर्व वस्त नश्वर आहेत. जर व्यक्तीने ही गोष्ट मनात आत्मसात केली तर जगातील कुठलेच दु:ख त्यास विचलित करु शकत नाही. भगवान बुद्धांनुसार, दु:ख निवृत्तीतून निर्वाणीत आहे. स्वत:ला राग–द्वेषातून मुक्त करणेच निर्वाण आहे, ज्यास थोड्या प्रयत्नातून मनुष्य आपल्या जीवनातच मिळू शकते.

## पंचांग

पंचांग
१७ जून २०२६
बुधवार
विक्रम संवत्– २०८२
निज ज्येष्ठ शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– निज ज्येष्ठ
ऋतु– सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि:तृतीया २१:३८:५४
नक्षत्र:पुनर्वसु १३:३६:४२
योग:ध्रुव २०:५०:३३
करण:तैतिल ११:१२:०४
करण:गर २१:३८:५४
सूर्य:मिथुन
चन्द्र:कर्क०८:१३:०१
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – मोहरम

तारीख – १
विशेष
महाराणा प्रताप जयंती (तिथीप्रमाणे)
गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी
राजमाता जिजाऊ साहेब भोंसले पुण्यतिथी (तारेखप्रमाणे)
रंभाव्रत
झाशीची रानी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तारेखप्रमाणे)
मुस्लिम नूतन वर्षारंभ
हिजरी सन १४४८ प्रारंभ
मुस्लिम मोहरम मासारंभ

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 3 | | | | | | |
| | 4 | | | | 6 | 5 | | |
| | | 8 | | | | | 6 | 4 |
| 2 | 6 | | 3 | 1 | 8 | 9 | | |
| | 5 | 4 | 2 | | 9 | 6 | 3 | |
| | | 9 | 6 | 4 | 5 | | 7 | 8 |
| 9 | 2 | | | | | 4 | | |
| | | 6 | 5 | | | | 2 | |
| | | | | | | 8 | 5 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९८२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 2 | 6 | 3 | 7 | 9 | 4 | 8 |
| 3 | 9 | 6 | 1 | 4 | 8 | 5 | 7 | 2 |
| 4 | 8 | 7 | 2 | 9 | 5 | 6 | 3 | 1 |
| 7 | 5 | 9 | 3 | 1 | 4 | 8 | 2 | 6 |
| 2 | 6 | 4 | 8 | 7 | 9 | 1 | 5 | 3 |
| 8 | 3 | 1 | 5 | 2 | 6 | 4 | 9 | 7 |
| 1 | 4 | 5 | 7 | 6 | 2 | 3 | 8 | 9 |
| 9 | 2 | 3 | 4 | 8 | 1 | 7 | 6 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 5 | 3 | 2 | 1 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८८५ – स्टाच्यु ऑफ लिबर्टीचे न्यूयॉर्क हॉर्बरवर आगमन झाले.
- १९४४ – आयलँड प्रजासत्ताक देश बनला.
- २००७ – अमेरिकेत नियंत्रण गमावल्यानंतर रेस कार प्रेक्षकांमध्ये घुसल्याने चार ठार व १५ जण जखमी झाले.
- २००७ – पाकिस्तानच्या पश्चिमोत्तर भागात मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात २२ जणांचा मृत्यू झाला.
- २००७ – अफगाणिस्तानमध्ये तालिबानी बंडखोरांच्या हल्ल्यात ४५ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००८ – रेल्वे पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने मुंबईतील चेंबूर नाका येथून साडे चौदा कोटी रूपयांचे ब्राऊन शुगर जप्त केले.

### जन्म

- १२३९ – एडवर्ड पहिला, इंग्लंडचा राजा.
- १८६७ – हेन्री लॉसन, ऑस्ट्रेलियन कवी.
- १९७३ – लिएंडर पेस, भारतीय टेनिसपटू.
- १९८० – व्हिनस व्हिलियम्स, अमेरिकन टेनिसपटू.
- १९८१ – शेन वॉटसन, ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटू.

### निधन

- १६३१ – मुमताज महल, मुगल बादशहा शाहजहाँची बायकोचे निधन.
- १६७४ – जिजाबाई, शिवाजी महाराजांची आई.
- १८५८ – राणी लक्ष्मीबाई झाशीची राणी(लढाईत).
- १८९५ – गोपाळ गणेश आगरकर, समाजसुधारक, विचारवंत.
- १९९६ – मधुकर दत्तात्रेय देवरस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक.
- २००४ – इंदुमती पारीख, सामाजिक कार्यकर्त्या.

## : SMS :

Who was the 1st Indian Cricketer 2 Bcum Captain in his 1st match, Score century in the same match & hit a 6 of the last ball 2 defeat England?

AAMIR KHAN in LAGAAN

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.८ | २५.३ |
| अहमदनगर | ३६.३ | २४.४ |
| अकोला | ४१.५ | ३०.३ |
| अमरावती | ४०.६ | २७.३ |
| बीड | ४२.९ | २९.३ |
| भंडारा | ४३.४ | ३०.८ |
| बुलढाणा | ४२.५ | २५ |
| चंद्रपूर | ४३ | २९.५ |
| चेन्नई | ४४.१ | ३२.९ |
| नवी दिल्ली | ४१.७ | २६.७ |
| धुळे | ३९.४ | ३० |
| गोंदिया | ४१.३ | ३०.७ |
| जळगाव | ४०.८ | २९.२ |
| कोल्हापूर | ३५.८ | २३.८ |
| लातूर | ३७.३ | २५.२ |
| मुंबई | ३९ | ३४.८ |
| नागपूर | ४०.९ | २९.६ |
| नांदेड | ३९.७ | २६.६ |
| नंदूरबार | ३६.२ | २६.५ |
| नाशिक | ३५.३ | २५.७ |
| पुणे | ३३.९ | २४.१ |
| पंढरपूर | ३८.९ | २५.५ |
| सातारा | ३६ | २२.७ |
| सांगली | ३७.५ | २३.६ |
| सोलापूर | ३९ | २६.२ |
| वर्धा | ४२.४ | २९.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम
आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
मनात अशांती असल्या कारणाने संकटाचा सामना करावा लागेल. जबाबदारीनुसार काम करा.

**मिथुन :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम
आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. अनकूल परिस्थिती निर्माण होईल.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पुर्व
आपल्या पराक्रमी वृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर
अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:दक्षिण
आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पूर्व
प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.


**धनु :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व
उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता.

**मीन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर
व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८३



### आडवे शब्द

१. संध्याकाळच्या आत
५. मरणोन्मुख
९. संधी, अवसर
१०. वर्ण
११. नखरा
१२. नशीब (इंग्रजी)
१३. निमूटपणे
१५. हरिणाचे पिल्लू
१७. 'सबका मालिक एक' संदेश देणारे शिर्डीचे संत
१९. एकाग्र नजर
२०. परमेश्वर
२२. श्रेष्ठ पुरुष
२४. हत्ती
२५. गुणाकारच्या विरुद्ध
२७. वाटोळा
२९. पुन्हा पुन्हा
३२. पाताळ
३४. रोगप्रतिबंधक द्रव, ३७. मृत्यूदेवता
३८. दर्जाहीन, निरुपयोगी
४०. देवीचा एक वार
४१. सर्वात मिळूनमिसळून राहणारा
४३. अशक्त व हट्टी
४५. भात शिजतानाचा आवाज
४७. जाणे–येणे, वहिवाट
४८. वस्तू उत्पादनाची जागा
५०. नरम, मुलायम
५२. झोंबणारे
५४. याची पुंगी वाजली नाही तरी मोडून खाता येते!
५६. रुग्णालय
५८. दृष्टी, दृष्ट
५९. तर्क
६०. आकाश
६१. कपडालत्ता
६३. सर्वस्व
६४. केसाळ प्राण्यांची कमावलेली कातडी (इंग्रजी)
६५. लहान मूल
६८. पाण्याचा प्रवाह
६९. 'तुझे नि माझे जमेना, परी तुझ्यावाचून ----!'
७०. अभिनेता
७१. किरकोळ सामानसुमान
७३. दिवस
७४. वाडगा, धातूचा द्रोण
७५. पक्षपात करणे (वाक्य प्रचार)
७६. भ्रम

### उभे शब्द

१. विलंब, उशीर
२. तमाशातील नाट्य
३. प्रकाश
४. अधिष्ठाता, संस्थाप्रमुख (इंग्रजी)
५. तुझे–माझे करणे
६. जुगार
७. साय
८. गावाखालची जमीन
९. स्वैर उधळलेला
९अ. खर्चात कपात
१४. मूळ आधार
१५. पलीकडे
१६. घोंगडी विणारी जमात
१७. धनको, कर्ज देणारा
१८. भिंगाचा एक प्रकार
२१. सासरा
२३. चांदी
२६. मिश्रण
२८. पार्वतीचे उग्र रूप
२९. दशावतारांपैकी सहावा
३०. समशेर
३१. मुद्द्याला सोडून, अघळपघळ (बोलणे)
३३. अंधार
३५. आरोप
३६. फळांपासूनचे पेय, ३८. न घाबरणारा
३९. जीभ, जिव्हा
४१. चप्पल, वहाण
४२. ठाम, निश्चयी
४४. होकार, मान्यता, ४६. सजावट करणारा
४९. घराणे, कूळ
५१. अगरबत्ती
५३. चुगल्या करणारा
५४. समुद्राच्या लाटांचा आवाज
५५. अटीची भाषा
५७. घाव, प्रहार
५८. त्रास, अडचण
५९. कार्यकारी अधिकारी
६२. पिंपरी–चिंचवड या नदीकाठी वसले आहे
६४. मोटरसायकल
६५. पूजापठण केले जाणारे धार्मिक पुस्तक
६६. श्रीकृष्णाच्या मुकुटाची शोभा वाढवणारे
६७. कौशल्य
६८. कबूतर
६९. मोठ्या शिस्तीचा
७०. 'नसणे'च्या विरुद्ध
७२. नूतन
७३. आठवड्याचा दिवस

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वडाची साल पिंपळाला लावणे ७.धमक १०.खप ११.तनमणी १२.हजर १४.परकाया १७.सन १८.तव १९.राखीपुनम २०.तहहयात २२.सरबत २३.काना २४.जरब २६.मतीमोल २८.रन ३०.सामना ३२.नाक ३३.दवाखाना ३५.वरात ३७.निवडणूक ३८.भार ३९.पल्ला ४०.कडकड ४१.वसुदेव देवकी ४३.सुर ४४.सतीचे वाण ४७.माठ ४८.रीम ५१.चेकर ५२.कोरी ५५.दासनवमी ५७.सक्षम ५९.गाजरगवत ६१.जाग ६२.ठसा ६४. मालदार ६७.अटक ६९.मोठा ७०.तसनस ७३.मवाळ ७४.माळवद ७६.खार ७७.लहान ७८.धरणीकंप ७९.मन

उभे उत्तर : १.वसाहत २.चीत्कार ३.लखलखीत ४.पिंप ५.लाडका ६.वर्ण ७.धन ८.मम ९.कणीक तिंबणे ११.तनया १३.जवस १४.पनवती १५.रव १६.यातना १७.सहकार १९.राबता २१.तज २३.कालवा २५.वसा २६. माकड २७.मोदक २९.नवरदेव ३१.मधुकर ३२.नावडतीचे मीठ अळणी ३४.खानेसुमारी ३६.तपकीरी ३७.निकस ३८.भाव ४२.देठ ४३.सुखदा ४५.चेक ४६.वारस ४९.मदतनीस ५०.जनगणमन ५२.कोमल ५३.रोज ५४.रंग ५६.सजा ५८.क्षमा ५९.गारठी ६०.रमत ६३.साट ६५.दामोदर ६६.दाखल ६८.कमाल ७१.सखा ७२.नरम ७५.वध

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## दक्षताच्या सूचना झुगारुन कचरा प्रकल्पाची निविदा; ठरावीक ठेकादारांना पायघड्या

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील ३०० मेट्रिक टन ओला व २०० मेट्रीक टन सुका कचरा प्रकल्पांची संयुक्त निविदा काढण्यामागचे प्रयोजन समजून येत नाही अशा शब्दात दक्षता विभागाने ताशेरे मारल्यानंतरही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करत राजकीय दबावाखाली निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. त्यामुळे ठराविक ठेकेदारांना पायघड्या घालण्यासाठी ही निविदा प्रक्रिया राबविली जात असल्याचा आरोप होत असताना दक्षता विभागाच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून अटी व शर्ती अंतिम केल्या आहेत. त्यामुळे यावरून पुन्हा वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे. उरुळी देवाची येथे ओल्या आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ५०० मेट्रीक टन क्षमतेचा संयुक्त प्रकल्प उभा केला जाणार आहे. पण यामध्ये शहराची गरज लक्षात घेण्याऐवजी ठेकेदारांची सोय बघून राजकीय हस्तक्षेप करून निविदेत स्पर्धा कमी होण्यासाठी खटाटोप सुरु आहे. त्यानुसार संयुक्त प्रकल्पाचा आग्रह धरून अटी व शर्ती निश्चित केल्या जात आहेत. त्यामुळे महापालिकेने कचरा प्रक्रियेसाठी ६९४ टिपिंग शुल्क निश्चित केले असले त्यापेक्षा खूप जास्त दर ठेकेदारांकडून येण्याची शक्यता आहे. दरम्यान मार्च महिन्यात घनकचरा विभागाने निविदा न काढता अत्यावश्यक बाब म्हणून याच कामाचा प्रस्ताव थेट स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आणला होता. पण त्यास विरोध झाल्यानंतर हा प्रस्ताव फेटाळून लावण्यात आला होता.

## योगेश सानप यांचा 'कॉम्रेड्स' मॅरेथॉनमध्ये भारतीय राष्ट्रीय विक्रम

पुणे (दैनिक संध्या) : दक्षिण आफ्रिकेतील जगप्रसिद्ध कॉम्रेडस या आव्हानात्मक मॅरेथॉनमध्ये भारतीय खेळाडूंमध्ये पुण्याच्या तीन खेळाडूंनी विक्रमी कामगिरी केली आहे. त्यात प्रसिद्ध अल्ट्रा धावपटू आणि कोच योगेश सानप यांनी ८५.७७ किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये ६ तास ५९ मिनिटे ५७ सेकंद अशी शानदार वेळ नोंदवत कॉम्रेड्स मॅरेथॉनच्या इतिहासातील सर्वात वेगवान भारतीय होण्याचा मान मिळवला. नुकत्याच झालेल्या या मॅरेथॉनमध्ये सानप (योसा) यांनी नवीन भारतीय राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्यासमवेत सार्थ साबळे यांनी ७ तास १५ मिनिटे ०८ सेकंद तर डॉ. योगेश सातव यांनी ७ तास २४ मिनिटे ४६ सेकंद अशी वेळ नोंदवत कॉम्रेड्स मॅरेथॉनमधील अनुक्रमे दुसरे आणि तिसरे वेगवान भारतीय धावपटू म्हणून आपले नाव नोंदवले. 'द अल्टिमेट ह्युमन रेस' म्हणून ओळखल्या कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये यंदा जगभरातून सुमारे २१ हजार ६३३ धावपटू सहभागी झाले होते. यंदाची कॉम्रेड्स मॅरेथॉनची ९९ वी आवृत्ती असून ती डर्बन ते पीटरमॅरिटझबर्ग दरम्यानची 'अप रन' (चढणीची शर्यत) होती, ज्यामध्ये पाच मोठ्या टेकड्यांचा समावेश होता.आंतरराष्ट्रीय अल्ट्रा-रनर असोसिएशन (आयएयू) च्या माहितीनुसार, पुरुषांमध्ये जॉर्ज कुशे यांनी ५ तास १५ मिनिटे ५६ सेकंदांच्या नव्या 'अप रन' रेकॉर्डसह, तर महिलांमध्ये गेर्डा स्टेन यांनी ५ तास ४९ मिनिटे ४६ सेकंदांसह प्रथम क्रमांक पटकावला. तीन वेळा बोस्टन मॅरेथॉनसाठी पात्र ठरलेल्या सानप यांनी जगातील सर्वात जुनी आणि अत्यंत मानाची समजली जाणारी ही अल्ट्रा-मॅरेथॉन ७ तासांच्या आत पूर्ण केली. याद्वारे त्यांनी या स्पर्धेत यापूर्वीचा सर्वात वेगवान भारतीय असण्याचा देवराव चौधरी यांचा विक्रम मोडला. प्रति किलोमीटर ४.५४ मिनिटे अशा उत्कृष्ट वेगाने ही शर्यत पूर्ण करणाऱ्या ३९ वर्षीय सानप यांनी सांगितले की, 'विक्रम मोडल्याची भावना अजूनही मनाला पूर्णपणे पटत नाहीये, हे सर्व एका स्वप्नासारखे वाटत आहे. मी दर आठवड्याला किमान २६० किलोमीटर धावण्याचा सराव करायचो, ज्यामध्ये स्पीड सेशन्स, हिल ट्रेनिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंगचा समावेश होता. मला दुखापतींपासुन दूर ठेवण्यात माझ्या फिजिओथेरपी टीमने महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्व प्रयत्नांमुळेच मी ७ तासांचा टप्पा पार करू शकलो.'

# क्रिझॅकची फॉरेनअॅडमिट्ससोबत भागीदारी

Crizac MAKING EDUCATION EASY

पुणे (दै. संध्या)

भारतातील अग्रगण्य तंत्रज्ञान-आधारित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या क्रिझॅक लिमिटेडने आज एज्युमेंट कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेडमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीची घोषणा केली. ही कंपनी फॉरेनऍडमिट्स या एआय-आधारित विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्मची संचालक आहे, जिने 100,000 हून अधिक विद्यार्थ्यांना सेवा दिली आहे आणि ₹1,500 कोटींहून अधिक किमतीच्या शैक्षणिक कर्जांची सोय केली आहे. कंपलसरी कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (सीसीडी) आणि कंपल्सरी कन्व्हर्टिबल प्रेफरन्स शेअर्स (सीसीपीएस) द्वारे केलेली ही गुंतवणूक, तंत्रज्ञान-आधारित, संपूर्ण विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्म म्हणून क्रिझॅकच्या सातत्यपूर्ण वाढीमधील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, ज्यामुळे, विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना सेवा देणाऱ्या एआय-आधारित वित्तपुरवठा आणि व्हिसा सोल्यूशन्ससह क्रिझॅक आपल्या पोहोचचा विस्तार करत आहे. या गुंतवणुकीमुळे, क्रिझॅक परदेशात शिक्षण घेण्याच्या प्रवासातील सर्वात महत्त्वाच्या टप्प्यांवर विद्यार्थ्यांना आणि समुपदेशन भागीदारांना सहाय्य करण्याची आपली क्षमता अधिक मजबूत करेल: जसे की, गंतव्यस्थान निवडणे, वित्तपुरवठा सुरक्षित करणे आणि व्हिसाची प्रक्रिया पूर्ण करणे. हे सर्व एआय-सक्षम तंत्रज्ञानाद्वारे समर्थित असेल, जे वेग, अचूकता आणि व्यापकता प्रदान करते. फॉरेनअॅडमिट्स आपल्या सध्याच्या ब्रँड आणि व्यवस्थापनाअंतर्गत एक स्वतंत्र संस्था म्हणून कार्यरत राहील, आणि आपल्या वाढीचा पाया असलेली संघटनात्मक लवचिकता व विद्यार्थी-केंद्रित संस्कृती कायम राखेल. क्रिझॅकने सातत्याने तंत्रज्ञान आणि भागीदारींमध्ये गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे ते आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गतिशीलतेमध्ये आघाडीवर आहे आणि यूके, कॅनडा, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमधील 400 हून अधिक संस्थांना समुपदेशन भागीदारांच्या जागतिक नेटवर्कशी जोडते. फॉरेनअॅडमिट्समधील गुंतवणूक हा या प्रवासातील पुढचा महत्त्वाचा टप्पा आहे: यामुळे प्लॅटफॉर्मवर वित्तपुरवठा आणि व्हिसा तयारीसाठी एआय-आधारित चालणारी, थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारी वैशिष्ट्ये आणता येतील आणि समुपदेशन भागीदारांना विद्यार्थ्यांना पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी आवश्यक साधने मिळतील.

फॉरेनअॅडमिट्स एकत्रित कंपनीमध्ये स्वतःचा, पुरस्कार-विजेता टेक्नॉलॉजी स्टॅक आणते:

- लोनमॉन्क: भारतातील पहिले प्रवेशपूर्व कर्ज पात्रता इंजिन, ज्याने 17 हून अधिक कर्जदाता भागीदारांसोबत 80,000 हून अधिक मूल्यांकन पूर्ण केले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज करण्यापूर्वीच आर्थिक स्पष्टता मिळते.
- व्हिसामॉन्क: एआय-आधारित व्हिसा मुलाखत सिम्युलेशन टूल, ज्यावर जगभरातील 3,000 हून अधिक विद्यार्थ्यांचा विश्वास आहे आणि ज्याने विद्यार्थी भरतीमधील डिजिटल इनोव्हेशन ऑफ द इयर साठी द पायोनियर अवॉर्ड्स 2025 जिंकले आहे.

## प्रिझमने नेटवर्क केले मजबूत

पुणे (दै. संध्या)

ओयोची मूळ कॉर्पोरेट कंपनी, प्रिझमने, पश्चिम भारतातील आपल्या विस्तार कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी पुणे येथे भव्य ट्रॅव्हल पार्टनर मीट आयोजित केली. या कार्यक्रमात प्रदेशातील 150 हून अधिक आघाडीच्या ट्रॅव्हल एजंट्स आणि पर्यटन उद्योगातील भागीदारांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमात प्रिझम ने आपल्या ग्राहकाभिमुख विविध ब्रँड्स आणि सेवांचे सादरीकरण केले. यामध्ये संडे, क्लबहाऊस, पॅलेट, टाऊनहाऊस आणि डॅनसेंटर या ब्रँड्सचा समावेश होता. राज्यभरातील ट्रॅव्हल एजंट्सनी PRISM च्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधून हॉस्पिटॅलिटी क्षेत्राविषयी माहिती मिळवली तसेच भारत आणि जागतिक स्तरावरील व्यावसायिक संधींचा आढावा घेतला. या सत्रात प्रिझम च्या विविध व्यवसायांमधील वाढीच्या संधींवरही विशेष प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये चेकइन हॉटेल्स, इनोव्हेट आणि चेकइन व्हॅकेशन्स या व्यवसायांचा समावेश होता. ट्रॅव्हल भागीदारांनी हॉटेल रूम बुकिंग, हॉलिडे पॅकेजेस, लाँग-स्टे अॅकॉमोडेशन, कॉर्पोरेट प्रवासाच्या गरजा तसेच फ्लेक्सिबल वर्कस्पेस पार्टनरशिप यांसारख्या विविध क्षेत्रांतील सहकार्याच्या संधींचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाला पर्यटन आणि प्रवास क्षेत्रातील विविध भागधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे पश्चिम भारतातील आपल्या भागीदारांचे जाळे अधिक मजबूत करण्याच्या प्रिझम च्या वचनबद्धतेला अधिक बळ मिळाले. प्रिझम साठी पुणे ही पश्चिम भारतातील सर्वात




महत्त्वाच्या पर्यटन बाजारपेठांपैकी एक आहे. व्यवसायिक प्रवास, एक्स्टेंडेड स्टे, वीकेंड सहली, कॉर्पोरेट कार्यक्रम, हॉलिडे पॅकेजेस तसेच फ्लेक्सिबल वर्कस्पेसेस यांसाठी शहरातून मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण होत आहे. मुंबईशी असलेली जवळीक तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या गंतव्यस्थळांशी वाढती कनेक्टिव्हिटी यामुळे पुणे हे पश्चिम भारतातील प्रिझम च्या भागीदार नेटवर्कचा विस्तार आणि ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. त्यामुळे या प्रदेशातील कंपनीच्या विकास धोरणामध्ये पुण्याला विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

## बहुमताच्या जोरावर शाळांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव मंजूर

पुणे (दै. संध्या)

महापालिकेच्या पाच शाळांतील साडेचार हजार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आकांक्षा फौंडेशनला पुढील तीन वर्षांसाठी अर्थसहाय्य देण्याच्या पीपीपी तत्वावरील प्रस्ताव आज स्थायी समितीमध्ये भाजपने बहुमताच्या जोरावर मंजूर केला.

आकांक्षा फौंडेशन २००७ पासून महापालिकेच्या पाच इंग्रजी माध्यमाच्या पाच शाळा सीएसआर मधून चालवत आहे. पण या संस्थेला हा खर्च परवडत नसल्याने महापालिकेकडे आर्थिक मदतीची मागणी केली होती. त्यानंतर खास या संस्थेसाठी पीपीपी तत्वावर शाळा चालविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. संस्थेने सुरुवातीला प्रति विद्यार्थी २७ हजार रुपये दराची मागणी केली होती, ज्यानुसार वार्षिक खर्च १२ कोटी १५ लाख रुपये होत होता. ही रक्कम अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त असल्याने उपआयुक्त (शिक्षण) यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत दराबाबत चर्चा करण्यात आली. अखेर संस्थेने २५ हजार रुपये दर स्वीकारला. यानुसार पुढील ९ वर्षासाठी आकांक्षा फाऊंडेशनला ४ हजार ५०० विद्यार्थ्यांसाठी तब्बल १०१ कोटी रुपये दिले जाणार होते. यावर टिकेची झोड उठल्यानंतर नऊ वर्षाऐवजी तीन वर्षांचा करार करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच अन्य संस्था महापालिकेच्या शाळा चालविण्यासाठी घेणार असतील तर त्यांनाही मंजुरी दिली जाईल, यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली जाणार आहे, अशी माहिती स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

## पुण्यात 'लेक सिटी' प्रकल्पाला गती

पुणे (दै. संध्या) : शहरातील तलावांचे संवर्धन, पर्यावरणीय संरक्षण आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जांभुळवाडी, पाषाण आणि कात्रज तलावांसाठी 'लेक सिटी' प्रकल्पाचा सर्वंकष आराखडा तातडीने तयार करावा. तसेच जांभुळवाडी तलावाचे जलसंधारण विभागाकडून पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, असे निर्देश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आज प्रशासनाला दिले.

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जावक क्र. जेनपा/कावी/१२८३/२०२६
दिनांक - १६/०६/२०२६

### जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

जाहिर निविदा २०२६-२०२७

जेजुरी नगरपरिषद, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे खाली नमूद केलेल्या विविध विभागांकडील कामांकरिता अनुभवी मान्यताप्राप्त व शासनाकडून योग्य त्या वर्गातील ठेकेदारांकडून सीलबंद निविदा/दरपत्रक मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १) | जेजुरी नगरपरिषद कार्यालयिन कामकाजा करिता स्टेशनरी पुरविणे व तदअनुषंगिक कामे करणे बाबत वार्षिक निविदा. | ५००/- | २०००/- |
| २) | जेजुरी नगरपरिषद कार्यालयिन कामकाजा करिता छपाई करणे व तदअनुषंगिक कामे करणे बाबत वार्षिक निविदा. | ५००/- | २०००/- |
| ३) | जेजुरी नगरपरिषद कार्यालयीन लोखंडी कपाट लोखंडी मांडणी, फर्निचर व तद्अनुषंगिक साहित्य पुरविणे बाबत वार्षिक निविदा. | ५००/- | २०००/- |

सदरिल कामाचे टेंडर फॉर्म/दरपत्रक सुटीचे दिवस सोडुन जेजुरी नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध होतील .तसेच सदर कामाच्या निविदा/दरपत्रक दिनांक १७/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत स्वीकारल्या जातील त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहित. कामासंबधी अधिक माहिती जेजुरी नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.

शिक्का

सही/-
(मुख्याधिकारी)
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

प्रपत्र-१
महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२५८१७५१७
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- buildingpune.ee@mahapwd.gov.in
ई-निविदा सूचना क्रमांक २ सन २०२६-२७ (ऑनलाईन)
(संदर्भ- सा. बां. विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दि. २७/०९/२०१८)

कार्यकारी अभियंता, सा.बां. (इमारती) विभाग, शिवकिर्ती, सदनिका क्र. जी ६/१ व ६/२, घोरपडी रोड, पुणे - ४११००१ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा नमुन्यातील अटीनुसार पात्र/सक्षम असलेले कंत्राटदार/संस्था/कंपनी यांचेकडून मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | मौजे पिरंगुट तालुका मुलशी जिल्हा पुणे येथील गट नंबर 272/अ मधील 17 हेक्टर जागासाठी गावठाण जमाबंदी प्रकल्प-स्वामित्व योजने अंतर्गत भूमि अभिलेख विभागाची प्रशिक्षण प्रबोधनीची संरक्षित भिंत बांधणेबाबत. | रु. ३,७४,७०,१७८/- |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. १८/०६/२०२६ ते दि. २५/०६/२०२६ |
| निविदापुर्व चर्चा बैठक दिनाक वेळ व पत्ता | दि. २२/०६/२०२६ वेळ स. १२.०० वाजता (बैठकीचे ठिकाण :- मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक, विभाग पुणे-४११ ००१ मध्यवर्ती इमारत आवार) |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २५/०६/२०२६ वेळ १८.०० पर्यंत |
| निविदा उघड्याचा दिनांक व वेळ | दि. २९/०६/२०२६ वेळ १०.०० पासुन पुढे |

निविदा सूचनेबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
E. www.mahapwd.com (फक्त निविदा सुचना)
२. mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१ कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/१४०८/२०२६
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, शिवकिर्ती, घोरपडी, पुणे-४११ ००१.
दि. २३/०९/२०२५
क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C1154

सही/-
(उ. सं. घावटे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
पुणे ४११ ००१.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव मौजे नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

गांव मौजे नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. शांताराम महादेव विटे व श्री. गणपत महादेव विटे यांचे मालकी ताबेवहिवाटीची असून खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे आशिलांनी श्री. शांताराम महादेव विटे यांचेबरोबर ठरविला आहे. त्यानुसार आमचे अशिल हे खेरदीखत करणार आहेत. सदर श्री. शांताराम महादेव विटे यांनी खालील परिशिष्टातील नमूद केलेली मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरोसा आमचे अशिलांना देवून कायमखुष खरेदीखत अथवा हस्तांतरण दस्ताने तबदिल करुन देण्याचे कबुल केलेले आहे. सदर परिशिष्टात वर्णनातील शेतजमीनवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा दावा, हक्कहितसंबंध व दान, गहाण, पोटगी, वुईल, खरेदी, विक्री, साठेखत इ. प्रकारचे व्यवहार अगर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांचे आत आमचे अशिल अथवा वर नमूद आमचे आशिलांचे विधीज्ञांचे पत्यावर कागदपत्रानिशी त्याविषयी खात्री करुन आमचे आशिलांना लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आमचे अशिल त्यांचा खरेदीखताचा व्यवहार ठरले प्रमाणे पुर्ण करतील, त्यानंतर आमचे अशिलांवर कोणाचीही हरकत सदर मिळकतीबाबत बंधनकारक राहणार नाही, सबब सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांचा व्यवहार करणे पुर्वी देण्यात येत आहे.

- परिशिष्ठ -

मिळकतीचे वर्णन :- तु. पुणे, पो. तु. नारायणगाव, ता. व. सं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत नारायणगाव येथील खाते क्र. ३२६० वरील शेती मिळकत.

| ग. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २६८/२ | ००.४१ | ०१.०४ |
| यापैकी शांताराम महादेव विटे यांचे समाईकातील अविभक्त हिश्यापैकी निम्म्या हिश्याची मिळकत. | | |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत यामधील झाडझाडोरा दगड, माती, यासह जाण्यायेण्याचे वहिवाटीचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस

जुन्नर,
दि. १५/०६/२०२६

सही/-
शमीम इ. इनामदार
एम.कॉम.एल एल.बी. जीडीसी अॅण्ड ए अॅडव्होकेट
ऑफिस - जांबूत फाटा (भोरवाडी), मु. पो. येडगाव,
ता. जुनर, जि. पुणे. ४१०५०४
मो. ९५६१२२३८५०

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/647/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

अकबर गफूर मोमीन, मु.पो. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत आळे - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार अकबर गफूर मोमीन मु.पो. आळे, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **अकबर गफूर मोमीन** यांचा **जन्म 20.1.1957 रोजी मौजे आळे, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 647/25 दिनांक 28.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/361/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

महेक अजिम इनामदार, मु.पो. वडगाव कांदळी, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत वडगाव कांदळी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार महेक अजिम इनामदार मु.पो. वडगाव कांदळी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **महेक अजिम इनामदार** यांचा **जन्म 22.6.2006 रोजी मौजे वडगाव कांदळी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 361/25 दिनांक 8.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/790/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

आकाश रामदास हिवरेकर, मु.पो. पारूंडे, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत पारूंडे - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार आकाश रामदास हिवरेकर मु.पो. पारूंडे, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **आकाश रामदास हिवरेकर** यांचा **जन्म 13.1.2007 रोजी मौजे पारूंडे, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 790/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/406/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

सिराज उस्मानगणी मणियार, मु.पो. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत ओतूर - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार सिराज उस्मानगणी मणियार मु.पो. ओतूर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **सिराज उस्मानगणी मणियार** यांचा **जन्म 10.11.1960 रोजी मौजे ओतूर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 406/25 दिनांक 8.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/460/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

जावेद अब्दुल रहेमान मोमीन, मु.पो. ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत ओतूर - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार जावेद अब्दुल रहेमान मोमीन मु.पो. ओतूर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **जावेद अब्दुल रहेमान मोमीन** यांचा **जन्म 5.3.1974 रोजी मौजे ओतूर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 460/25 दिनांक 30.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/779/25 — दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

रेश्मा सिताराम कणसे, मु.पो. बोरी, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत बोरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार रेश्मा सिताराम कणसे मु.पो. बोरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **रेश्मा सिताराम कणसे** यांचा **जन्म 10.5.1983 रोजी मौजे बोरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 779/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार रूस्तुम इब्राहीम शेख मु.पो. निरगुडे, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **रूस्तुम इब्राहीम शेख** यांचा **जन्म 1.1.1941 रोजी मौजे निरगुडे, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 434/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**शिक्का** **अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/762/25 दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

हलीमाबी अश्रफअली पिरजादे, मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार हलीमाबी अश्रफअली पिरजादे मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **हलीमाबी अश्रफअली पिरजादे** यांचा **जन्म 11.8.1965 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 762/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**शिक्का** **अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/374/25 दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

सलीम अब्दुलहमीद इनामदार, मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार सलीम अब्दुलहमीद इनामदार मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **सलीम अब्दुलहमीद इनामदार** यांचा **जन्म 24.7.1997 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 374/25 दिनांक 8.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**शिक्का** **अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/411/25 दिनांक:- 05.06.2026.

**नोटीस**

शकिल पापा मोमीन, मु.पो. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत आळे - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार शकिल पापा मोमीन मु.पो. आळे, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **शकिल पापा मोमीन** यांचा **जन्म 02.6.1966 रोजी मौजे आळे, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 411/25 दिनांक 8.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 05/06/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**शिक्का** **अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीबारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी, भोर
उपविभाग, भोर यांचे कार्यालय,
राजवाडा चौक, ता. भोर, जि.पुणे
दिनांक : 09/06/2026

**क्रमांक : भूसं/खाजगी वाटीघाटी/एसआर/1/2026**

ज्याअर्थी मौजे पाल बु. ता. वेल्हे जि. पुणे येथील राजमाता सईबाई स्मृतीस्थळ जि. पुणे विकास आराखडाकडे जाणारा रस्त्याबाबत शासन परिपत्रक एलएक्यु ०१/प्र.क्र.१२/अ-२ दि.२५/०१/२०१७, नुसार राजमाता सईबाई स्मृतीस्थळ विकास आराखड्याकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हाधिकारी पुणे, (भूसंपादन-समन्वय शाखा) यांचे आदेश क्र. पीएलसी/सीआर/०३/२०२६ दि.३०/०१/२०२६ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन परिपत्रक एलएक्यु ०१/प्र.क्र.१२/अ-२ दि.२५/०१/२०१७ व शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि.२७/११/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अर्थी, आता

1. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी. विकास खरात, उपविभागीय अधिकारी भोर,

उपविभाग भोर याव्दारे

1. अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग,, पुणे यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे; आणि

II. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 च्या व शेड्यूल I च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर 25% रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

III. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग, पुणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मार्गावत आहे.

2. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी भोर, उपविभाग भोर / कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग,, पुणे / उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग वेल्हे यांचेकडे दाखल करावीत.
3. संमतीपत्राच्या (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी भोर, उपविभाग भोर ता. भोर, जि. पुणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग,, पुणे यांचे प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांस उपलब्ध करून देण्यात येईल.
4. सदर पक्रल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी भोर, उपविभाग भोर यांच्या कार्यालयामध्ये व / कार्यकारी अभियंता सा.बां. (दक्षिण) विभाग,, पुणे यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची - एक**
**खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशील**

गावाचे नांव - मौ. पाल बु.. ता. वेल्हे जि.पुणे

| अ.क्र. | ग.नं. | एकूण क्षेत्र हे.आर चौ.मी. | संपादन होणारे क्षेत्र हे. आर चौ.मी. |
|---|---|---|---|
| 1 | 152 | 0.33.90 | 0.06.20 |
| 2 | 153 | 0.36.80 | 0.06.32 |
| 3 | 156 | 0.11.60 | 0.01.72 |
| 4 | 157 | 0.36.80 | 0.06.64 |
| **एकूण** | | | **20.88** |

दिनांक:- ९/०६/२०२६
ठिकाण:- भोर, जि.पुणे

**सही/-**
**(अनुराधा भंडारे)**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. (दक्षिण) विभाग, पुणे**

**सही/-**
**(डॉ. विकास खरात)**
**उपविभागीय अधिकारी**
**भोर, उपविभाग भोर**

**जिमाका/पुणे/जाहिरात/७१/२०२६-२७**



## ज्ञानेश्वर शिळवणे यांना सह्याद्री रत्न संत साहित्य गौरव पुरस्कार प्रदान

चाकण (दै. संध्या) : सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल येथील उद्योजक व माजी उपसरपंच ज्ञानेश्वर शिळवणे यांना नालंदा फाउंडेशनच्या वतीने सह्याद्री रत्न संत साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. आधी केले मग सांगितले हे ब्रीद सत्यात उतरवणारे उद्योजक ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब शिळवणे यांचे विविध क्षेत्रातील कामकाज उल्लेखनीय आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रेरणा देण्यासाठी नालंदा फाउंडेशनने हा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले व कायदे तज्ञ पी.टी.राव आदींच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. शाल, श्रीफळ, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल खेडचे आमदार बाबाजी काळे, शिवसेनेचे पुणे जिल्हा प्रमुख रामदास धनवटे, नगराध्यक्षा मनिषा गोरे आदींनी त्यांचे कौतुक केले.

## खालुंब्रे येथे गुरुवारी चक्राकार मार्ग भूसंपादनाबाबत विशेष ग्रामसभा

चाकण (दै. संध्या) : खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे गुरुवारी (दि.१८) चक्राकार मार्ग भूसंपादनाबाबत विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली आहे. खालुंब्रे येथील चक्राकार मार्ग धोक्याचा की फायद्याचा याबाबत खालुंब्रे येथील ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने गुरुवारी सकाळी अकरा वाजता ग्रामसभेचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ग्रामपंचायत अधिकारी श्रीधर नाईकडे व प्रशासक एस.एस. साळुंके यांनी दिली. नागरिकांनी या ग्रामसभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन खालुंब्रे ग्रामपंचायत प्रशासनाने केले आहे.

# पुणे महानगरपालिका

उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ क्र. ३
निविदा जाहिरात - नविन कामे

प्रसिद्धी दिनांक : १७/०६/२०२६ वर्तमान पत्राचे नाव - दै. पुणे मिरर/दै. संध्या

विक्री कालावधी दिनांक :- १७/०६/२०२६ ते २९/०६/२०२६ वेळ :- दु.१२.०० पर्यंत
स्वीकृती कालावधी दिनांक :- १७/०६/२०२६ ते २९/०६/२०२६ वेळ :- दु.१२.०० पर्यंत
जाहिरात क्र.-११-DC-३-२०२६-२७
टेंडर उघडणे दिनांक :- ३०/०६/२०२६ दुपारी १२.०० वाजता.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | विभागाचे/खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत | अंदाजित पुर्वगणित रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-83-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३६ मधील तळजाईमाता मंदिर येथे गणेशोत्सव विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३७२९.०० | ४२३७ | ६ महिने |
| २ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-84-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३७ मधील थोरवे शाळा व विविध ठिकाणचे भवन दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४७३९७.०० | ८४७४ | १० महिने |
| ३ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-85-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३७ मधील संत गाडगेबाबा आरोग्य कोठी व प्रभागातील विविध ठिकाणी आरोग्य कोठी विषयक तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४७४१९.०० | ८४७४ | १० महिने |
| ४ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-86-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३६ मधील विविध ठिकाणी गणेशोत्सव विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३७२९.०० | ४२३७ | ६ महिने |
| ५ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-87-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३७ मधील मनपा शाळा, मनपा दवाखाने व मनपा इमारतीमध्ये भवन विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३६९८.०० | ४२३७ | १० महिने |
| ६ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-88-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३६ मधील पद्मावती परिसर व विविध ठिकाणी समाज मंदिर व विरंगुळा केंद्र दुरुस्ती विषयी कामे करणे. | ४१५ | ८४७३८१.०० | ८४७४ | १० महिने |
| ७ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-89-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३६ मधील मनपा इमारती व मनपा शाळा मध्ये भवन विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७३६४.०० | ८४७४ | १० महिने |
| ८ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-90-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३७ मधील मनपा इमारती, मनपा शाळा, मनपा दवाखाने यांची भवन दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४७३६४.०० | ८४७४ | १० महिने |
| ९ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-91-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ मधील कात्रज नवीन वसाहत परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४७०८१.०० | ८४७१ | १२ महिने |
| १० | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-92-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ मध्ये गुजर निंबाळकरवाडी परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४१९८५.०० | ८४२० | १२ महिने |
| ११ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-93-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ मध्ये मांगडेवाडी परिसरात विविध ठिकाणी रस्ते करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४१८२५३.०० | ४१८३ | १२ महिने |
| १२ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-94-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ मध्ये गुजर निंबाळकरवाडी परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३७०१.०० | ४२३७ | १२ महिने |
| १३ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-95-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील सुंधामाता मंदिर येथील परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४२४०२.०० | ८४२४ | १० महिने |
| १४ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-96-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्रभाग क्र. ३८ मध्ये बालाजी नगर, काशिनाथ पाटील नगर व परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२३७१६.०० | ४२३७ | १० महिने |
| १५ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-97-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील खंडोबा मंदिर अंजनी नगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४२३८७.०० | ८४२४ | १० महिने |
| १६ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-98-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील साईधाम लेन संतोषी माता मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४२३८७.०० | ८४२४ | १० महिने |
| १७ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-99-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये अंजनीनगर, बाबाजीनगर परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४१८४४०.०० | ४१८४ | १० महिने |
| १८ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-100-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील अंजनीनगर परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१८७४.०० | ४२१९ | १० महिने |
| १९ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-101-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील जैन मंदिर परिसरात व प्रभागात विविध ठिकाणी पावसाळी लाईन व ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२०३२९.०० | ४२०३ | १० महिने |
| २० | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-102-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये गणेश कॉलनी, संतोषनगर व प्रभागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे | ४१५ | ४२१८८०.०० | ४२१९ | १० महिने |
| २१ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-103-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मधील शिवदर्शन चाळ क्र. १२९, १२८ परिसरात व विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ४१५ | ८४२३५२.०० | ८४२४ | १० महिने |
| २२ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-104-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मधील तळजाई परिसर व विविध ठिकाणी गल्लीबोळात काँक्रीट व ब्लॉक विषयक कामे करणे. | ४१५ | ८४७४५२.०० | ८४७५ | १० महिने |
| २३ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-105-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मध्ये प्रभागात विविध ठिकाणी २.५ इंच जाडीची फरशी बसविणे व काँक्रीट विषयक कामे करणे. | ४१५ | ८४०८७८.०० | ८४०९ | १० महिने |
| २४ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-106-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मधील तळजाई वसाहत परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन विषयक कामे करणे. | ४१५ | ८४२४०८.०० | ८४२४ | १० महिने |
| २५ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-107-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र.क्र. ३६ मधील गोलघर, शाहू वसाहत, तावरे कॉलनी व विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती व साफसफाई करणे. | ४१५ | ८४२३५७.०० | ८४२४ | १० महिने |
| २६ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-108-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मधील प्रभागात विविध ठिकाणी राडारोडा उचलणे विषयक कामे करणे. | ४१५ | ९९९९१२.०० | ९९९९ | १० महिने |
| २७ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-109-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मधील संभाजीनगर व विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४२४०७.०० | ८४२४ | १० महिने |
| २८ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-110-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मध्ये तळजाई बायोगॅस परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज व काँक्रीटीकरण विषयक कामे करणे. | ४१५ | ८४२३६८.०० | ८४२४ | १० महिने |
| २९ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-111-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३६ मध्ये शिवदर्शन परिसर व विविध ठिकाणी २.५ इंच जाडीची फरशी बसविणे व तदनुषंगिक कामे करणे. | ४१५ | ८४०८७८.०० | ८४०९ | १० महिने |
| ३० | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-112-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये आंबेगाव बुद्रुक परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४२४०६.०० | ८४२४ | १० महिने |
| ३१ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-113-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये निलगिरी चौक, फाले नगर परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ४२१८५४.०० | ४२१९ | १० महिने |
| ३२ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-114-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये टेल्को कॉलनी, जांभुळवाडी रस्ता व आंबेगाव खुर्द परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८४२४०३.०० | ८४२४ | १० महिने |
| ३३ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-115-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मधील आंबेगाव खु, आंबेगाव बु., अंजनीनगर, बालाजीनगर व प्रभागात विविध ठिकाणी राडारोडा उचलणे. | ४१५ | ४९९९५६.०० | ५००० | १० महिने |
| ३४ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-116-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र. क्र. ३८ मध्ये आंबेगाव खुर्द परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८३९७३४.०० | ८३९७ | १० महिने |
| ३५ | PMC/ZONE-3/DNK-KTR-AMG-117-2026-27 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | प्र.क्र. ३८ मध्ये आंबेगाव बुद्रुक परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे व दुरुस्ती विषयक कामे करणे. | ४१५ | ८३९७०२.०० | ८३९७ | १० महिने |

1) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती नुसार ठेकेदाराने सादर करावयाच्या कागदपत्रांवर ठेकेदाराने स्वाक्षरी करुन अ पाकिटात अपलोड करावयाचे आहे.
2) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
3) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपुर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा Contact No :- ०१२०-४२००४६२/०१२०-४००१००२/९१-८८२६२४६५९३
4) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
5) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ (वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

**सही/-**
**उप आयुक्त परिमंडळ क्र. ३**
**पुणे महानगरपालिका, पुणे**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### न्यू इंग्लिश स्कूल गोजुबावी येथे विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा

गोजुबावी (दैनिक संध्या) : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल गोजुबावी,येथे दिनांक १५/०६/२०२६ रोजी विद्यालयाचे मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे मॅडम व इतर सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प व पुस्तके देऊन करण्यात आले यावेळी पालकांचाही सहभाग होता,इयत्ता 5 वी वर्गशिक्षक सौ.पानसरे मॅडम यांनी नियोजन केले. पोषण आहारा अंतर्गत विद्यार्थ्यांना गोड शिरा देण्यात आला.विद्यालयामध्ये नवीन प्रवेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.वरील कार्यक्रमाचे उत्तम नियोजन श्री.भोसले सर,पानसरे मॅडम व सर्व सेवकांनी केले. यावेळी सौ.अर्चना अनारसे,सौ.लीना सोनटक्के,सौ.मनीषा विरकर,श्री.अजिनाथ थोरात, श्री विजय जाधव,श्री. बजरंग गटकळ उपस्थित होते.

### अनुसूचित जाती व नवबौध्द स्वयंसहायता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजनेचा लाभ

पुणे (दैनिक संध्या) : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने उपलब्ध करून देण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत किमान ९ ते १८ अश्वशक्ती क्षमतेचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करण्यासाठी प्रति पात्र बचत गटास रु. ३.१५ लाखांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जिल्हा पुणे कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्व्हे क्र. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे – ४११००६ येथे स्वीकारले जातील. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी बचत गट नोंदणीकृत असणे, गटाच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेत खाते असणे, गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असणे, सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे तसेच गटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असणे आवश्यक आहे. पात्र स्वयंसहायता बचत गटांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोईटेवाडी येथे रंगला विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव सोहळा

भोईटेवाडी (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोईटेवाडी येथे सण 2026-27 नवागत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा सोहळा संपूर्ण गावाने एकत्र येत ट्रॅक्टर ट्रॉली सजवून ढोल,ताशा व लेझीम यांच्या पथकासह वाजत गाजत संपूर्ण गावात शाळेतील सर्व मुलांची मिरवणूक काढली.सोबतच सर्व महिला भगिनींनी त्यांचे औक्षण करून त्यांच्या पहिल्या शैक्षणिक पावलाचा ठसा सोनपावले म्हणून जतन करण्याचा निर्धार केला.यासोबत सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके,मोफत गणवेश व इतर शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.तसेच सर्वांना अल्पोपहार देऊन व विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करून फुग्यांच्या साथीने व फुलांच्या सुगंधाने त्यांच्या आयुष्यातील शिक्षणाच्या गणेशाचे सर्वांनी मनोभावे स्वागत केले.

### चोपडज शाळेचा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा

चोपडज (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोपडज येथे आज नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस प्रवेशोत्सवाच्या विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.यावेळी सकाळी विद्यार्थ्यांना फेटे बांधून ट्रॅक्टर मधून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.शाळा प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये पंचायत समितीचे सदस्य मा.श्री.जितेंद्र पवार साहेब,राष्ट्रवादी काँग्रेस युवतीच्या चोपडज शाखाध्यक्षा कुमारी तेजश्री भंडलकर,माजी मुख्याध्यापक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक माननीय श्री.मधुकर गायकवाड गुरुजी,पत्रकार माननीय श्री.अडागळे साहेब,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माननीय श्री.लक्ष्मण जगताप या विविध पदाधिकारी,ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प,पाठ्यपुस्तके,गणवेश देऊन व पेढे भरवून सर्व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते माननीय श्री.उमेश गायकवाड यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.यावेळी सर्व मान्यवरांनी, शिक्षकांनी, ग्रामस्थांनी,पालकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

### सक्तीच्या मीटर बदलाला विरोध



नारायणगाव (दैनिक संध्या) : महावितरणकडून सध्या स्मार्ट मीटर बसवण्याबाबत वीज ग्राहकांना एसएमएस आणि इतर माध्यमांतून सूचना दिल्या जात आहेत. मात्र, ग्रामीण भागातील ग्राहकांमध्ये यामुळे मोठा संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, सुस्थितीत असलेले आणि अचूक रीडिंग देणारे विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करू नये, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी केली आहे. बाळासाहेब औटी यांच्या मते, वीज ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे ही ग्राहक पंचायतीची महत्त्वाची भूमिका आहे. तंत्रज्ञानाला विरोध नाही, मात्र ग्राहकांच्या संमतीशिवाय आणि पुरेशी माहिती न देता कोणतीही सक्ती खपवून घेतली जाणार नाही. ग्राहकांच्या हक्कासाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने संघर्ष करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. स्मार्ट मीटर तंत्रज्ञानाबाबत ग्राहकांना योग्य माहिती, सुरक्षा व्यवस्था, तपासणी सुविधा आणि भविष्यातील आर्थिक परिणामांबाबत स्पष्टता देणे आवश्यक आहे. स्मार्ट मीटर नादुरुस्त झाल्यास त्याची निष्पक्ष तपासणी करण्यासाठी मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आणि पारदर्शक व्यवस्था असावी. वीज कायदा 2003, ग्राहक संरक्षण कायदा 2019 आणि संविधानिक अधिकारांचा विचार करूनच कोणतीही प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे असे सांगितले.

वीज ग्राहकांसाठी आवाहन:

तुमचा सध्याचा मीटर व्यवस्थित चालू असेल आणि रीडिंग योग्य असेल तर त्याची नोंद ठेवा.

स्मार्ट मीटर बसवण्यापूर्वी महावितरणकडून लेखी माहिती आणि स्पष्टीकरण मागावे.

कोणत्याही प्रकारची सक्ती किंवा दबाव निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज द्यावा.

आपल्या हक्कांबद्दल जागरूक राहावे आणि कोणतीही कारवाई शांततामय व कायदेशीर मार्गाने करावी.

# समाज घडणीसाठी लोकशिक्षकांची आवश्यकता : डॉ. श्रीपाल सबनीस




**पिंपरी (दै. संध्या)**

खरा शिक्षक कधीच निवृत्त होत नाही. निवृत्तीपेक्षा प्रवृत्ती मार्ग स्वीकारून समाजाच्या घडणीसाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे". असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ श्रीपाल सबनीस यांनी केले.

नवी सांगवी येथील निळू फुले नाट्यगृहात आयोजित केलेल्या 'शिक्षणयात्री श्रीकांत चौगुले' या गौरव ग्रंथाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रसिद्ध मुलाखतकार सुधीर गाडगीळ, प्रसिद्ध वक्ते प्रा मिलिंद जोशी,तर अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ पंडित विद्यासागर होते. साहित्य परिषदेचे कार्यवाह माधव राजगुरू, श्रीकांत चौगुले आदी मान्यवर व्यासपीठावर तर प्रसिद्ध कवी विठ्ठल वाघ, संत साहित्याचे अभ्यासक डॉ शिवाजीराव मोहिते, आमदार शंकरशेठ जगताप, शिक्षण समिती सभापती रवीना आंगोळकर , निवृत्त शिक्षण सहसंचालक अशोक राजगुरू व मकरंद गोंधळी तसेच राजन लाखे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सबनीस पुढे म्हणाले की "शिक्षकाने जात-धर्माच्या पलीकडे जाऊन सत्यधर्म स्वीकारावा, केवळ माहिती देणारा नव्हे तर विश्लेषण करणारा मार्गदर्शक असावा. महापुरुषांचे विचार आत्मसात करून संविधान संस्कृती जगणे आणि ती समाजात रुजवणे आवश्यक आहे ,त्यासाठी शिक्षकांचे कार्य शाळेपुरते मर्यादित न राहता त्यांनी समाजशिक्षक म्हणून कार्य केले पाहिजे." राष्ट्राचे चारित्र्य केवळ राजकीय नेते नव्हे, तर जागरूक आणि मूल्यनिष्ठ शिक्षकच घडवू शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

श्रीकांत चौगुले यांनी शिक्षण क्षेत्रात अडतीस वर्षे विविध पदांवर काम केले. याचबरोबर बालभारती, बालचित्रवाणी, एससीईआरटी. या राज्यस्तरीय शिक्षण संस्थांमध्ये योगदान दिले. या सर्वांबाबत डॉ राजा दीक्षित, प्रा प्रवीण दवणे, डॉ यशवंत पाटणे, पद्मश्री गिरीश प्रभुणे तसेच अनेक मान्यवरांनी या गौरवग्रंथासाठी लेखन केले आहे.

प्रा. मिलिंद जोशी यांनी बोलताना "श्रीकांत चौगुले हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. शैक्षणिक, सामाजिक, कला आणि साहित्य क्षेत्रात त्यांनी पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात उल्लेखनीय कार्य केले आहे. 'गाव ते महानगर' या पुस्तकाचे लेखक म्हणून त्यांनी ग्रामीण ते शहरी परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण वेध घेतला आहे. साहित्य, संस्कृती आणि समाजजीवनाशी त्यांची घट्ट नाळ जोडलेली असून विविध नामवंत साहित्यिक, विचारवंत आणि निवेदकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. आपल्या लेखन, सामाजिक बांधिलकी आणि विविध उपक्रमांमधील सक्रिय सहभागामुळे श्रीकांत चौगुले यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे प्रा. जोशी यांनी नमूद केले. "स्वातंत्र्यपूर्वकाळात समाज हा घडणीसाठी शिक्षकांनी मोठे योगदान दिले. त्यामध्ये लोकमान्य टिळकांपासून साने गुरुजींपर्यंत अनेकांचा उल्लेख त्यांनी केला."

समाजात आर्थिक संपत्तीपेक्षा माणसे जोडणे अधिक महत्त्वाचे असल्याचे मत डॉ. पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले "नवीन शैक्षणिक धोरण (NEP) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत असून त्यामध्ये कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. बदलत्या काळात केवळ पदवी नव्हे, तर विविध कौशल्ये आत्मसात करणे ही शिक्षण क्षेत्राची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने आपली ऊर्जा सकारात्मक, सर्जनशील आणि समाजोपयोगी कार्यासाठी वापरावी. इतरांना उपदेश करण्यापेक्षा स्वतःच्या कृतीतून आदर्श निर्माण केल्यास समाजावर अधिक प्रभाव पडतो. व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यवृद्धी आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधून प्रगतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. सत्कारार्थी मनोगत व्यक्त करताना चौगुले म्हणाले की "38 वर्षांच्या सेवा काळातील कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या समारंभाचे आयोजन केले आहे". माधव राजगुरू यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी दौंडकर यांनी केले. आभार धनश्री चौगुले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा दिगंबर ढोकले यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन शिरीष पडवळ, एम पी चौगुले, आर बी पाटील यांनी संयोजन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गायिका अर्चना सुतार यांनी शारदास्तवन सादर केले. कार्यक्रमाच्या दरम्यान डॉ. जयेश जोशी यांच्यावतीने श्रीकांत चौगुले यांची ग्रंथतुला करण्यात आली.




## चाकण येथे भामा इंग्लिश मिडियम मध्ये मुलांचे स्वागत

**चाकण (दै. संध्या)**

चाकण येथील स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल, स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज चाकण येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या नवगत विद्यार्थी यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई सुरेशभाऊ गोरे, संस्थेचे अध्यक्ष विकासभाऊ गोरे व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मार्गदर्शक मनोहरबापू शेवकरी यांच्या हस्ते गुलाबपुष्प, शैक्षणिक साहित्य, पुस्तकं देऊन आणि मुलांचे औक्षण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिंसिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, प्रेरणा काळे, विभाग प्रमुख सुवर्णा चौधरी, गणेश काळे, लीना चौधरी सर्व विभाग शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते. सुवर्णा चौधरी यांनी सर्वांचे आभार मानले.

## मोहन नगर येथील प्राथमिक शाळेत 'पहिले पाऊल' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात उत्साही स्वागत!



**पिंपरी (दै. संध्या)**

चिंचवड मोहन नगर येथील 'लिलाबाई कांतीलाल खिंवसरा प्राथमिक शाळा' येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी 'पहिले पाऊल' आणि स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात शाळेत पहिल्यांदाच येणाऱ्या चिमुकल्यांचे स्वागत लेझीम आणि ढोल पथकाच्या गजरात अत्यंत उत्साही वातावरणात करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये शाळेत येण्याचा प्रचंड उत्साह आणि आनंद पाहायला मिळाला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त संदीप खोत, नगरसेविका वैशालीताई काळभोर आणि नगरसेविका अरुणाताई लंगोटे उपस्थित होते. तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पूजा समिंदर, मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका आशा विष्णू निचळ आणि मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री कैचे यांचीही व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना यावेळी विविध प्रकारच्या बियांचे वाटप करण्यात आले. "जसे जसे विद्यार्थी शिकून मोठे व प्रगल्भ होत जातील, तशीच ही रोपे आणि झाडेही वाढत जातील," हा सुंदर आणि पर्यावरणपूरक उद्देश डोळ्यासमोर ठेवून शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी मुलांना रोज शाळेत नियमित येण्यासाठी प्रोत्साहित केले आणि अभ्यासासोबतच इतर उपक्रमांत भाग घेण्याचे आवाहन केले. तर नगरसेविका वैशालीताई काळभोर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, *"तुम्ही सर्व मुले भारताचे उज्ज्वल भविष्य आहात, शाळेतील पूर्वतयारी आणि तुमचे संस्कार देशाला पुढे नेणारे ठरतील."

याप्रसंगी शासनाच्या योजनेअंतर्गत पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश आणि शालेय पोषण आहाराचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### शिक्षकांचे विशेष परिश्रम

हा स्वागत सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सतीश पाटील, कृष्णा केंगले, कविता लांडगे, मनीषा टिळेकर, रोहिणी दिवेकर, चंद्रज्योती लोखंडे, छाया बाचकर, प्रतिभा गायकवाड आणि सुरेखा शिरसाठ इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता अत्यंत आनंदी वातावरणात झाली.

## रूपालीताई कांडगे यांच्या माध्यमातून बुजवला अपघातग्रस्त खड्डा



**चाकण (दै. संध्या)**

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे चाकण मधील जय भारत चौकातील अपघात ग्रस्त खड्डा बुजवून नगरसेविका रुपालीताई कांडगे यांनी एक मोठी समस्या मार्गी लावली.

मार्केट यार्ड जवळील अत्यंत वर्दळीचा असलेल्या जय भारत चौकात पडलेला धोकादायक खड्डा प्रशासकीय पातळीवर तातडीने हालचाली करून नगरसेविका रूपाली कांडगे यांच्या पुढाकारातून बुजवण्यात आला. त्यामुळे संभाव्य अपघात टळले आहेत. जय भारत चौक हा शहरातील अत्यंत गजबजलेला आणि मुख्य चौक आहे. या ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावर एक मोठा खड्डा पडला होता. या वर्दळीच्या रस्त्यावरून दुचाकी आणि चारचाकी वाहनांची सतत येजा सुरू असते. या खड्ड्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांचा अंदाज चुकून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून हा खड्डा तातडीने बुजवावा, अशी मागणी होत होती.

या प्रभागाच्या कर्तव्यदक्ष नगरसेविका रुपाली कांडगे व नगरसेवक राहुल कांडगे यांनी तात्काळ दखल घेतली. प्रशासकीय सूचनेनंतर ठेकेदार चेतन कौटकर यांनी सामाजिक बांधिलकी दाखवत अत्यंत तत्परतेने हा खड्डा बुजवून रस्ता पूर्ववत होण्यासाठी प्रयत्न केले.

### नागरिकांकडून कौतुकांचा वर्षाव

“नागरिकांच्या सुख-दुःखात आणि अडीअडचणीला धावून जाण्याच्या कांडगे दांपत्याच्या या कार्यपद्धतीचे परिसरात कौतुक होत आहे. नागरिकांच्या सेवेसाठी आम्ही सदैव कटिबद्ध असून, प्रभागातील प्रत्येक समस्या सोडवणे हे आमचे मुख्य ध्येय असल्याचे रूपाली कांडगे व राहुल कांडगे यांनी सांगितले.”

## हेमंतभाऊ कोल्हे यांचा साधेपणाने वाढदिवस साजरा

**नारायणगाव (दै. संध्या)**

उत्तर पुणे जिल्ह्यातील अग्रगण्य समजली जाणारी, आर्थिक दृष्ट्या संपन्न, आणि सभासदांच्या विश्वासास पात्र असणारी धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्था नारायणगाव तालुका जुन्नर या संस्थेचे विद्यमान संचालक आणि ग्रामपंचायत नारायणगावचे विद्यमान सदस्य यांचा धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्था संस्थेच्या कार्यालयात पुष्पगुच्छ देवून वाढदिवस साजरा करण्यात आला. धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रवीणदादा डेरे यावेळी म्हणाले, "पतसंस्था ही सहकारी तत्त्वावर चालणारी आर्थिक संस्था असते. लोकांच्या बचतीला प्रोत्साहन देणे आणि गरजू सभासदांना कर्ज उपलब्ध करणे. हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट जरी असले". तरी ' धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्था ही संस्था नफा कमवण्यापेक्षा सभासदांच्या कल्याणाला प्राधान्य देते' या सर्व कारभाराला उत्तमपणे साथ देणारे संस्थेचे विश्वासू संचालक असावे लागतात. त्यापैकी या संस्थेचे सर्वच संचालक विश्वासू आहेत.त्यापैकी एक हेमंतभाऊ कोल्हे आहेत.

म्हणूनच उत्तर पुणे जिल्ह्यामध्ये धर्मवीर नागरी सहकारी पतसंस्था ही शिखर पार करत आहे. यासाठी संचालक हेमंत कोल्हे यांचे योगदान आहे. यावेळी पतसंस्थेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर औटी म्हणाले, 'पतसंस्थेचे सभासद हेच त्याचे मालक असतात. आणि तेच ग्राहक असतात.

# शिक्षकांमध्ये संशोधनाचा दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे : डॉ. अ. ल. देशमुख



**राजगुरुनगर (दै. संध्या)**

शालेय समस्या निवारण करण्यासाठी संशोधन हा उत्कृष्ट मार्ग आहे. त्यासाठी शिक्षकांमध्ये संशोधनाचा दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.अ.ल.देशमुख यांनी केले. खेड तालुका सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक प्रबोधन कार्यशाळेत 'शिक्षणातून संशोधनाकडे' या विषयावर ते बोलत होते. बाफना रंगमंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, मुख्याध्यापिका संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, पर्यवेक्षक सोपान निसरड, हौशीराम मुठे, सुनीता ठाकूर, लतीफ शाह उपस्थित होते. यावेळी महात्मा गांधी विद्यालय व इंग्रजी माध्यम विद्यालयाचे १५० अध्यापक उपस्थित होते. डॉ. अ.ल.देशमुख म्हणाले की, सध्या शाळांमधून अनेक उपक्रम सुरू आहे परंतु त्या उपक्रमांना कृत्रिम व उदासीन स्वरूप प्राप्त झालेले आहे. उपक्रमांच्या अतिरेकामुळे अध्यापकांवरील ताण वाढत चालला आहे. त्यामुळे उपक्रम असावे पण ते संशोधन पद्धतीने केल्यास उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये नेमकं काय संक्रमित झालेलं आहे, त्याचं मोजमाप करता आलं पाहिजे.

त्यासाठी शिक्षकांनी वेगळा विचार करायला हवा. आपल्या विद्यालयातील समस्यांचा अभ्यास करून त्या कशा कमी करता येईल यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे. त्यानंतरच विद्यालयाच्या गुणवत्तेवर विश्वासार्हता निर्माण होईल. यावेळी मुख्याध्यापिका संध्या कांबळे यांनी कार्यशाळेचे प्रस्तावित केले. पर्यवेक्षक लतीफ शाह यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अर्चना गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षिका सुनीता ठाकूर यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## साष्टे येथील शाळेत नाविन्यपूर्ण पध्दतीने विद्यार्थ्यांचे स्वागत

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : सोमवार दिनांक १५ जुन २०२६ रोजी साष्टे ता. हवेली जि. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमीक शाळा नाविन्यपूर्ण पद्धतीने व उत्साहात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले . यावेळी प्रथम इयत्ता पहिली मध्ये नव्याने दाखल विद्यार्थ्यांना फेटे बांधून ट्रॅक्टर व डीजे समवेत संगीतमय प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती इयत्ता पहिली मध्ये नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले. शालेय आवारात वृक्षारोपण करण्यात आले . शाळा पूर्वतयारी मेळावा क्रमांक दोनचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी हवेली पंचायत समिती सदस्या सौ सुषमाताई मुरकुटे उपस्थित होत्या. तसेच कोलवडी साष्टे ग्रामपंचायत उपसरपंच माननीय चैत्राली गायकवाड, कोलवडी साष्टे ग्रामपंचायत विद्यमान सदस्य व माजी उपसरपंच माननीय निलेश रिकामे, सदस्या सौ निशाताई भोर, साष्टे पोलीस पाटील सौ अश्विनी मोरे ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत चौधरी तसेच आजी माजी सरपंच उपसरपंच पालक वृंद व ग्रामस्थ मोठ्या बहुसंख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते. शाळेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. दुपारी प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक शेळके सर यांनी केले तर सहशिक्षक मुगळे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पुरंदर हायस्कूल आणि बालविकास मंदिरात नवागत विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात




पुरंदर (दैनिक संध्या) : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पुरंदर हायस्कूल सासवड व बालविकास मंदिर प्राथमिक विभाग या संकुलामध्ये 15 जून 2026 रोजी शैक्षणिक वर्ष 2026 च्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. ढोल लेझीम पथकाच्या माध्यमातून वाजत गाजत विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, गुलाब पुष्प, शैक्षणिक साहित्य, गोड खाऊ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. पहिल्या दिवशी एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुलींचे मोफत पास एसटी डेपोचे मॅनेजर मोहिनी ढोरे यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले, यावेळी संस्थेचे हितचिंतक श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक अरुण अप्पा जगताप, स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, नगरसेवक बाळासाहेब भिंताडे, नगरसेवक माऊली गिरमे,राजेंद्र गिरमे, बंडूकाका जगताप, कैलास जगताप सचिन पठारे संदीप देवकर अक्षरात जगताप संदीप जगताप उपस्थित होते संकुलाचे प्राचार्य इस्माईल सय्यद यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून अभ्यासाच्या व शिस्तीच्या महत्त्वाच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या. विद्यालयाचे पर्यवेक्षक विजय खोमणे, राजाभाऊ कदम, नंदादीप कदम, बाळासाहेब झेंडे, गणेश पावरा, विजय हिले यांनी स्वागत उत्सवाचे नियोजन केले.

## आर्मी कॅम्पमध्ये ड्रिल व सांस्कृतिक स्पर्धेत ज्ञानसागरचा प्रथम क्रमांक



सावळ (बारामती) (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुल,सावळ येथे NCC Directorate, Delhi आणि 3 MAH ARMD SQN NCC, Pune यांच्या संयुक्त विद्यमाने NCC CATC-207 निवासी कॅम्प दिनांक 25 मे 2026 ते 3 जून 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पदरम्यान NCC कॅडेट्सना विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात येत आहे.कॅम्पमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये ज्ञानसागर गुरुकुलच्या कॅडेट्सनी उत्कृष्ट कामगिरी करत ड्रिल व सांस्कृतिक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या शिस्तबद्ध प्रशिक्षण पद्धतीचा आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा गौरव झाला आहे. कॅम्पदरम्यान कॅडेट्सना ड्रिल,शिस्त, नेतृत्वगुण,राष्ट्रसेवा,आपत्ती व्यवस्थापन,अग्निशमन प्रशिक्षण तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे सर्वांगीण विकासाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

## ‘कांचन पगारे’ नाटकातून साकारणार मजनू ही 'बंगाली' व्यक्तिरेखा

मुंबई (दै. संध्या)



हिंदी आणि मराठी मनोरंजन विश्वात, तसेच छोट्या पडद्यापासून ते मोठ्या पडद्यापर्यंत आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे अष्टपैलू अभिनेते कांचन पगारे आता एका नव्या दमाने रंगभूमीवर परतले आहेत. 'तरंगिणी एंटरटेनमेंट' आणि 'नवनीत' निर्मित, तसेच प्रमोद शेलार लिखित व दिग्दर्शित 'शिक्कामोर्तब' या नव्याकोऱ्या नाटकातून ते रसिक प्रेक्षकांना आपल्या प्रतिभेची एक वेगळीच जादू दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. नाटक ही कलाकाराच्या अभिनय क्षमतेची खरी कसोटी मानली जाते. प्रसिद्धीपेक्षा कलेवरील निष्ठा आणि अभिनयातील प्रामाणिकपणा जपत, रंगभूमीशी पुन्हा घट्ट नाते जोडण्याचा कांचन पगारे यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. 'शिक्कामोर्तब' या नाटकात त्यांनी एका मजनू ह्या 'बंगाली' माणसाची अत्यंत अफलातून आणि आव्हानात्मक भूमिका लीलया साकारली आहे. बंगाली धाटणीच्या मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी आणि त्या भूमिकेची योग्य पकड घेण्यासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत नाटकाच्या सादरीकरणात स्पष्टपणे दिसून येते. मजनू या पात्रात स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन ते जिवंत करण्याची त्यांची शैली वाखाणण्याजोगी आहे.

## नागरिकांनी अचूक माहिती द्यावी : जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)



पीएलएफएस व एएसयुएसई सर्वेक्षणात शास्त्रीय नमुना निवड पद्धतीनुसार काही निवडक कुटुंब व आस्थापनांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. ही कुटुंबे किंवा आस्थापना संपूर्ण समाजाचे प्रतिनिधत्व करतात. त्यामुळे प्रत्येक कुटुंब व आस्थापनाने दिलेली माहिती ही अत्यंत मौल्यवान असून ती जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे या सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या प्राधिकृत अन्वेषकांना नागरिकांनी आवश्यक ती अचूक व वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत घेण्यात येणाऱ्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएफएस) व असंघटित क्षेत्रातील उद्यामांचे वार्षिक सर्वेक्षण (एएसयुएसई) यांची पुणे जिल्ह्यात १५ जून २०२६ पासून सुरुवात करण्यात आली. या सर्वेक्षणाचा शुभारंभ जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते सर्वेक्षणाची माहिती देणाऱ्या घडीपत्रिका व बॅनरचे जिल्हाधिकारी कार्यालय येथे अनावरण करून करण्यात आला. यावेळी जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उप आयुक्त प्रियांका बोकील, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या सांख्यिकी अधिकारी तृप्ती निंबाळकर, इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लि.चे ज्ञानेश्वर काळे, प्रकल्प व्यवस्थापक अजित कोकरे, प्रादेशिक समन्वयक गायत्री लाड, समन्वयक उपस्थित होते.

या सर्वेक्षणाद्वारे रोजगार बेरोजगार श्रमशक्ती सहभाग दर स्वयंरोजगार, लघु व असंघटीत क्षेत्रातील उद्योग- व्यवसायांची स्थिती, कामगारांचे उत्पन्न वेतन आणि आर्थिक क्रियाकलाप यासंबंधीची माहिती संकलित करण्यात येणार आहे. संकलित माहितीच्या आधारे जिल्हास्तरीय विकास आराखडे तयार करणे, रोजगार विषयक धोरणे निश्चित करणे, उद्योग व गुंतवणूक क्षेत्रांना चालना देणे, तसेच राज्याच्या व देशाच्या विकासाचे अचूक चित्र समोर आणणे शक्य होणार आहे. सदर सर्वेक्षणासाठी इप्सोस रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नियुक्त केलेल्या अन्वेषकांमार्फत सदर सर्वेक्षण संपूर्ण महाराष्ट्र राज्यात घेण्यात येत आहे.

## पिंपरे खुर्दमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

नीरा (दै. संध्या)

■ गावातून मिरवणूक, औक्षण, पाऊलखुणा अन् सेल्फी पॉइंटमुळे पहिलाच दिवस ठरला संस्मरणीय

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पिंपरे खुर्द (ता. पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे अनोख्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. गावातून काढण्यात आलेली मिरवणूक, औक्षण, पाऊलखुणा, खाऊ वाटप आणि आकर्षक सेल्फी पॉइंटमुळे विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिलाच दिवस आनंदोत्सवात साजरा झाला.

सोमवारपासून शाळा सुरू होताच पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातील ग्रामस्थ, पालक आणि लोकप्रतिनिधींनी विशेष पुढाकार घेतला. पंचायत समिती सदस्य मोनिका कांबळे आणि सरपंच राजेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांची गावातून उत्साहपूर्ण मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि आनंदी वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. शाळेत आगमनानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या पाऊलखुणा कागदावर उमटवून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची प्रतीकात्मक सुरुवात करण्यात आली. या भावनिक आणि प्रेरणादायी क्षणाला पालकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी सरपंच राजेंद्र गायकवाड यांच्या माध्यमातून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच उभारण्यात आलेल्या आकर्षक सेल्फी पॉइंटने विद्यार्थी आणि पालकांचा आनंद द्विगुणित केला. अनेकांनी या अविस्मरणीय क्षणांचे छायाचित्रांद्वारे जतन केले.

कार्यक्रमास सरपंच राजेंद्र थोपटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहिदास थोपटे, मुख्याध्यापिका विशाखा मेमाणे, ग्रामसेविका योजना चव्हाण, पोलिस पाटील संघाचे उपाध्यक्ष राहुल शिंदे, माजी उपसरपंच भरत निगडे, पोलिस पाटील रूपाली सोनवणे, साहेबराव शिंदे, बाबा दगडे, राजेंद्र पटणे, सचिन यादव, संभाजी गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, शाहरुख मुलाणी, दत्तात्रय जाधव यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण झाले असून, संपूर्ण गावाने शाळेला दिलेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद कौतुकास्पद ठरला आहे.

पिंपरे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. पहिली ते सातवीपर्यंत शिक्षणाची सुविधा असलेल्या या शाळेला आदर्श शाळेचा दर्जा मिळवून देण्यात माजी मुख्याध्यापक महादेव माळवतकर गुरुजी यांचे मोठे योगदान आहे. विशेष म्हणजे सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी विद्यार्थ्यांच्या स्वागत सोहळ्यास उपस्थित राहून शाळेप्रती असलेली आपुलकी जपली.

## मुंबईत शाळकरी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव जल्लोषात

भिवंडी (दै. संध्या)



आज मुंबईत नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ जल्लोषात संपन्न झाला, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाच्या अखत्यारितील शाळा १५ जून रोजी सुरू होतात. या निमित्ताने विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे स्वागत करण्यासाठी मुंबईतील शिक्षक कार्यकर्त्यांनी विशेष तयारी केली होती. या प्रवेशोत्सवात मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमीतजी साटम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळांमध्ये शिक्षक कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले. त्यांच्या प्रेरणेतूनच या उपक्रमाला व्यापक स्वरूप मिळाले असून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, चॉकलेट-मिठाई वितरण, तसेच पर्यावरण पदयात्रा यांसारखे विविध उपक्रम आज त्या निमित्ताने राबविले. आ. अमीतजी साटम यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, “शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. विद्यार्थ्यांना योग्य वातावरण, प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळाले तर ते भविष्यात सक्षम नागरिक बनतील. प्रवेशोत्सवासारखे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण करतात आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ करतात.”




## मोहनिश वसंत सावंत यांना ‘आदर्श कार्यकर्ता समाजभूषण पुरस्कार २०२६’

पुणे (दै. संध्या)

सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या कार्यातून समाजामध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे युवा कार्यकर्ते श्री. मोहनिश वसंत सावंत यांना "आदर्श कार्यकर्ता गौरव समिती" यांच्या वतीने "आदर्श कार्यकर्ता समाजभूषण पुरस्कार २०२६" प्रदान करण्यात आला. या मानाच्या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा पुन्हा एकदा गौरव झाला आहे. श्री. मोहनिश सावंत हे अनेक वर्षांपासून विविध सामाजिक, धार्मिक आणि जनकल्याणकारी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. गरजू नागरिकांना मदत, सामाजिक जनजागृती, युवकांना प्रोत्साहन, धार्मिक उत्सवांचे नियोजन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे.

## पशुपालक आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या शासन निर्णयांची अंमलबजावणी रखडली

लोणी काळभोर (दै. संध्या)



**महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटना आक्रमक**

पशुसंवर्धन विभागामार्फत मागील काही वर्षांत पशुपालक आणि कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितासाठी मंजूर करण्यात आलेल्या विविध शासन निर्णयांची (GR) तालुका व गाव पातळीवर अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. या उदासीनतेमुळे राज्यातील लाखो पशुपालक आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रशासनाविरोधात मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा 'महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटना' आणि 'महाराष्ट्र राज्य शासन पशुसंवर्धन समन्वय समिती'ने दिला आहे.या संदर्भात संघटनेचे कार्याध्यक्ष शरद बाळासाहेब गोडांबे व उपाध्यक्ष नंदकुमार चौधरी यांनी महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन आयुक्त किरण पाटील यांना लेखी पत्र देऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत.

राज्यातील ७५लाख पशुपालक शेतकऱ्यांच्या वतीने शासनाने मंजूर केलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पशुखाद्य विक्री करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या खाद्याच्या गोणीवर अन्न घटकांची ठळक नोंद करणे आणि शेतकऱ्यांसोबत एकतर्फी करार न करता तो रजिस्टर करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, या नियमाची कोणतीही अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही. या पत्रात पशुखाद्य कायद्या संदर्भात देखील सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच, राज्यात वारंवार आयुक्तांच्या बदल्या केल्या जातात, त्या थांबवल्या जाव्यात अशी विनंती राज्य सरकारला करण्यात आली आहे.तसेच अनेक पशुखाद्य कंपन्यांची अद्याप नोंदणी झालेली नाही, ती जिल्हावार जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

जर येत्या काही दिवसांत शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी झाली नाही, आणि निकृष्ट दर्जाच्या पशुखाद्याची चढ्या दराने होणारी विक्री व फसवणूक न थांबल्यास, हजारो शेतकरी पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयाच्या आवारात तीव्र आंदोलन करतील. तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासोबत तात्काळ बैठक आयोजित करून पशुपालकांच्या समस्या मार्गी लावण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## येरवडा खुले कारागृहात प्रासादिक कीर्तन सोहळा

**संत विचारांनी बंदी झाले मंत्रमुग्ध : कीर्तनातून बंद्यांच्या मनपरिवर्तनाचा संदेश : १५० बंद्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

पुणे (दै. संध्या)



कारागृहातील बंद्यांच्या मानसिक परिवर्तनासह त्यांच्या पुनर्वसनाला चालना देण्याच्या उद्देशाने येरवडा खुले जिल्हा कारागृहात सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि वै. मामासाहेब दांडेकर वारकरी सेवा संघ, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य प्रासादिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कारागृह विभागाच्या ‘सुधारणा व पुनर्वसन’ या ब्रीदवाक्यानुसार बंद्यांमध्ये सकारात्मक विचार रुजावेत आणि त्यांचे सामाजिक पुनर्स्थापन सुलभ व्हावे यासाठी विविध सांस्कृतिक, सामाजिक, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून क्रांतिकारक कीर्तनकार ह.भ.प. निलेश महाराज झरेगावकर यांचे प्रासादिक कीर्तन आयोजित करण्यात आले. आपल्या ओघवत्या आणि रसाळ वाणीतून निलेश महाराजांनी संत परंपरा, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज तसेच वाल्मिकी ऋषी यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा दाखला देत मानवी जीवनाचे महत्त्व, चुका सुधारण्याची संधी आणि सद्गुणांचा अंगीकार करण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले. कीर्तनादरम्यान ज्ञानोबा-तुकारामांच्या गजराने संपूर्ण कारागृह परिसर दुमदुमून गेला आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओव्यांचा उल्लेख करत कीर्तनाच्या संदेशाचे सार मांडले. कारागृहातील बंद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अशा अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात सुमारे १५० बंद्यांनी सहभाग नोंदविला. हा उपक्रम अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य डॉ. सुहास वारके यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

